# शिवभोजन योजनेचे अनुदान लाटण्यासाठी एकाच थाळीसमोर ५० जणांचे फोटो ?

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -३०० | शुक्रवार,दि.०४ जुलै २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-300 | Friday, Dt.04 July 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# रूपालीताई, पिडीतांना न्यायहक्क देण्यासाठी का घटनेचे राजकीय भांडवल करण्यासाठी येणार ?



## विधिमंडळाचे अधिवेशन सोडून शोबाजी करत ही भटकंती कशासाठी – अॅड.हेमाताई पिंपळे

बीड /प्रतिनिधी

महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या महाराष्ट्र विधिमंडळाचे महत्त्वपूर्ण अधिवेशन सुरू असताना तिथे राज्यातील महिलांचे प्रश्न मांडून ते सोडवण्याऐवजी महाराष्ट्रात शोबाजी करत भ्रमंती का करत आहेत ?

बीडच्या कथित उमाकिरण प्रकरणामध्ये पिडीतेला न्याय मिळावा यासाठी खरंच पुढाकार घेणार, की राजकीय पोळी कोणाची तरी भाजण्यासाठी हा उठा ठेव करण्यासाठी तुम्ही बीडमध्ये येणार आहात का ? असा थेट सवाल रूपालीताई चाकणकर यांना बीडच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या अॅड. हेमाताई पिंपळे यांनी केल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडणार आहे.

बीड येथील शैक्षणिक संकुल उमाकिरण हॉल येथे अल्पवयीन मुलीवर लैंगिक छळ केल्याप्रकरणी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोन शिक्षकांवर गुन्हे दाखल करून अटक करण्यात आलेली आहे. या प्रकरणावरून राज्यात पुन्हा एकदा रान पेटलेले असतानाच महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर या उद्या बीड दौऱ्यावर येणार आहेत.

या पार्श्वभूमीवर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अॅड हेमाताई पिंपळे यांनी रूपाली चाकणकर यांना थेट काही प्रश्न विचारले आहेत.

याचे उत्तर चाकणकर यांच्याकडे आहेत का ? विचारलेले प्रश्न असे आहेत, रूपाली चाकणकर आपल्या महिला आयोग अध्यक्ष पदाचा कार्यकाळ २२ ऑक्टोबरला संपणार होता.का मग असं कोणतं गौड गोड बंगाल तुमच्यामध्ये लपलेलं आहे ज्यामध्ये १६ तारखेलाच विशेष गॅझेट काढून तुमची पुन्हा पुनर्नियुक्ती केली गेली ?

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महिलांच्या प्रश्नावर

(उर्वरीत पान २ वर)



# पालकमंत्री अजित पवारांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीमुळे बीड येथे 'सीट्रिपलआयटी' उभारणीच्या कामाला गती

## बीडमधील 'सीट्रिपलआयटी'साठी एमआयडीसीकडून चार हजार चौरस मीटर जागा व निधी देण्याचा निर्णय पालकमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारामुळे 'सीट्रिपलआयटी'चा मार्ग खुला

मुंबई :- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने बीड येथे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अॅन्ड ट्रेनिंग' अर्थात 'सीट्रिपलआयटी'साठी बीड एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या सुविधा क्रमांक तीन मधील चार हजार चौरस मीटर जागा तसेच केंद्र उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय 'एमआयडीसी'च्या संचालक मंडळाने घेतला आहे. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन होण्याचा मार्ग खुला झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण बैठका घेऊन 'सीट्रिपलआयटी'च्या उभारणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली आहे. 'एमआयडीसी'च्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे केंद्रासंदर्भातील त्रिपक्षीय करार आणि प्रकल्पाचे भूमीपूजन लवकरच होईल अशी अपेक्षा आहे. गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात नगरपरिषदेतर्फे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून 'सीट्रिपलआयटी' यापूर्वीच सुरु करण्यात आली आहे. रत्नागिरी येथे औद्योगिक क्षेत्रात 'सीट्रिपलआयटी' सुरु करण्यासाठी 'एमआयडीसी'ला योजना अभिकर्ता म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. शिर्डी येथील 'सीट्रिपलआयटी'साठी एमआयडीसीने निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच धर्तीवर बीड येथील 'सीट्रिपलआयटी'साठीही एमआयडीसीने निधी उपलब्ध करुन देण्याचा तसेच योजना अभिकर्ता म्हणून जबाबदारी पार पाडण्याचा निर्णय एमआयडीसीच्या संचालक मंडळाने घेतला आहे. एमआयडीसीचा हा निर्णय बीड जिल्ह्यातील

(उर्वरीत पान २ वर)

# ई–पीक पाहणीस ०६ जुलैपर्यंत मुदतवाढ

## पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंतची मुदत

बीड : शेतकऱ्यांना ई–पीक पाहणी करण्यात येत असलेल्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगाम २०२४-२५ करीता सहायक स्तरावरील ई-पीक पाहणीसाठी ०६ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळवले आहे. ई–पीक पाहणीची प्रक्रिया वेळेत, अचूकपणे पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व महसूल, कृषी अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या आहेत. मंडळ अधिकारी यांना मोबाईल पद्वारे पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे, असेही त्यांनी कळवले आहे.


शेतकऱ्यांना ई–पीक पाहणी करण्यात येत असलेल्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगाम २०२४-२५ करीता सहायक स्तरावरील ई-पीक पाहणीसाठी ०६ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आह

# बीड जिल्ह्यात शिवभोजन योजनेच्या अनुदानात संगणमताने लाखोचा अपहार !

बीड प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शिवभोजन थाळी योजनेच्या नावाखाली शासनाच्या तिजोरीवर संगणमताने दरोडा टाकण्याचा प्रकार समोर आला आहे. राज्य सरकारकडून गरजू नागरिकांसाठी चालवली जाणारी शिवभोजन थाळी योजना ही कमी दरात जेवण देण्याचा उपक्रम आहे. मात्र, याच योजनेचा गैरवापर करत अवाजवी थाळ्यांचे अनुदान मिळवण्यासाठी एकाच थाळी समोर हॉटेलमध्ये आलेले इतर गिराईक देखील शिवभोजन करत असल्याचे दाखवून शासनाची फसवणुक करत असल्याचा प्रकार उघड झाला आहे. शिवभोजन थाळीच्या घोटाळ्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या घोटाळयामध्ये शिवभोजन थाळीचे अनुदान मंजूर करणाऱ्या कर्मचाऱ्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत मोठ्या प्रमाणात

(उर्वरीत पान २ वर)



### शिवभोजन योजनेच्या भ्रष्टाचारात चालकापासून अधिकाऱ्यांची साखळी..

बीड जिल्ह्यात ज्या शिवभोजन केंद्रांना मान्यता दिली आहे त्या शिवभोजन केंद्रांची अचानक तपासणी होणे गरजेचे आहे. अनेक शिवभोजन केंद्र फक्त कागदावरच आहेत. मात्र अनुदानामध्ये त्यांच्याकडे दररोज शेकडो लाभार्थ्यांनी जेवण केल्याचे कागदपत्रे तयार केले जातात. बहुतांश शिवभोजन केंद्रात असाच प्रकार सुरू आहे. बोटावर मोजण्या एवढीच शिवभोजन केंद्र प्रामाणिक असतील.यामध्ये केवळ शिवभोजन केंद्र चालकच दोषी नसून त्यांचे अनुदान मंजूर करणाऱ्या कर्मचाऱ्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एक मोठी साखळी निर्माण झाली आहे. हा भ्रष्टाचार उघड करून गोरगरिबांच्या जेवणावर डल्ला मारणाऱ्या नतदृष्ट्यांना शासनाने चांगली चपराक देणे गरजेचे आहे.फ

# अर्वाच्य भाषेत अधिकाऱ्याला धमकवणाऱ्या सादिक इनामदार विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल

बीड ।प्रतिनिधी


महिला अधिकाऱ्याच्या कक्षात जाऊन अर्वाच्य भाषेत धमकावले आणि लज्जास्पद वर्तन केल्याप्रकरणी तथाकथित समाजसेवक सादिक बाबामियां इनामदार याच्या विरुद्ध बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात काम करून घेण्यासाठी धमकावणे आणि विनयभंग प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, बीड जिल्हा परिषदेच्या एका महिला अधिकाऱ्याला दिनांक २ जुलै रोजी सादिक बाबामियां इनामदार यांनी दिनांक २३ जून ते २ जुलै २०२५ दरम्यान कार्यालयात वारंवार येऊन अपंग अनुकंपा

(उर्वरीत पान २ वर)

### उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तीने कायदा हाती घेणे गंभीर बाब

भ्रष्टाचार निर्मूलनाचा तथाकथित स्वयंघोषित अध्यक्ष असलेला सादेक उच्च शिक्षित असून अशा प्रकारे कायदा हातात घेऊन गंभीर गुन्हे करणे ही अशोभनीय कृत्य आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करून कायमस्वरूपी प्रतिबंध करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



पोलीस अधीक्षक, बीड यांचे कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, बार्शी रोड, बीड - ४३१ १२२.
दुरध्वनी क्रमांक ०२४४२ -२२२३०१ फॅक्स क्र.०२४४२-२२१३३३
ई मेल - sp.beed@mahapolice.gov.in

जा.क्र.जिविशा/शस्त्र परवाना रद्द/अहवाल/2025/बीड, 2571 दिनांक 07 /04/2025

प्रति,
मा.जिल्हाधीकारी सो.,
बीड

संदर्भ :- 1) जा.क्र.सपोअ/शस्त्र परवाना/अहवाल/2024-1111 केज दि.28/03/2025

विषय :- शस्त्र परवाना रद्द करणेबाबत..

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सविनय सादर की,पोलीस ठाणे धारुर हद्यीतील शस्त्र परवाना धारक नामे सादेक बाबामिया मुलानी/इनामदार रा.कसबा, विभाग धारुर ता.धारुर जि.बीड यांचेवर पोलीस ठाणे धारुर येथे दि.11/03/2025 रोजी शशीकांत विठ्ठलराव घुले वय 47 वर्षे व्यवसाय नौकरी पोह/747 यांचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे धारुर गुरनं 71/2025 कलम 189(2),190,115(2) बीएनएस सह कलम 110,117 महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे उल्लंघन केले म्हणुन गुन्हा दाखल झालेला असुन सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे. तसेच शस्त्र परवाना धारक हे त्यांचेकडील शस्त्र परवान्याचे उल्लंघन करुन शस्त्रासह फोटो वेगवेगळ्या अॅंगलमधे काढुन लोकांच्या मनामध्ये भिती निर्माण होईल या हेतुने सोशल मिडीयावर फोटो व्हायरल करीत असल्याचे दिसुन येत आहे.सदरचे फोटो यासोबत जोडले आहेत.

त्यामुळे पोस्टे प्रभारी अधिकारी धारुर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग केज यांचे मार्फतीने शस्त्र परवानाधारक नामे सादेक बाबामिया मुलानी रा.कसबा धारुर विभाग धारुर यांचेवर दाखल झालेल्या गुन्ह्याचे अनुषंगाने त्यांचेकडील शस्त्रपरवाना क्रमांक 2021/BR/03 रद्द होणेबाबतचा प्रस्ताव इकडील कार्यालयास सादर केला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन करुन असे निदर्शनास येत आहे की सादेक बाबामिया मुलानी रा.कसबा धारुर विभाग धारुर यांचे विरुद्ध शस्त्र परवाना मिळाल्यानंतर गुन्हे दाखल असुन त्यांच्याकडुन भविष्यात शस्त्र परवानाद्वारे मिळालेल्या शस्त्राचा ते दुरुपयोग करुन आणखी मोठ्या स्वरुपाचा गुन्हा करु शकतात.असे आमचे स्पष्ट मत आहे. तरी सादेक बाबामिया मुलानी रा.कसबा धारुर'विभाग धारुर यांचा शस्त्र परवाना रद्द करणेस विनंती आहे.

नवनित कॉंवत (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, बीड.

सहपत्र :- 1) उपविभागीय पोलीस अधिकारी केज यांचा प्रस्ताव
2) प्रभारी अधिकारी धारुर पो.स्टे. यांचा प्रस्ताव
3) दाखल गुन्ह्यांच्या अहवालाच्या प्रती (FIR).

### शासकीय अधिकारी कर्मचारी बेजार

सादिक बाबामिया मुलानी/ इनामदार हे बीड जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात जाऊन अधिकारी कर्मचारी यांना माहितीच्या अधिकाराखाली धमकावतात. त्यांच्याकडून नको त्या अपेक्षा व्यक्त करतात.जर अपेक्षांची पूर्तता झाली नाही तर त्यांच्याविरुद्ध तक्रारी करून आणि तक्रारीचे पत्र प्रसिद्धी माध्यमांना देऊन बदनामी करतात. यामुळे विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी कर्मचारी या व्यक्तीला आणि त्यांच्या गैर कृत्याला बेजार झाले आहेत. अशा प्रतिक्रिया अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधून व्यक्त होत आहेत. या संदर्भात देखील जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक यांनी गांभीर्याने दखल घेऊन पुढील कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. अशी चर्चा अधिकारी कर्मचारी वर्गातून होत आहे.

# उमाकिरण प्रकरणात लवकरच 'दूध का दूध, पाणी का पाणी' होईल

## आरोपी माझ्या जवळचे असले तरीही मी त्यांची पाठराखण केली नाही आणि करणार नाही – आमदार संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीडमधील उमाकिरण शैक्षणिक संकुलात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपी प्रा.विजय पवार हे बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या जवळचे असून त्यांनी आरोपीना मदत केली असल्याचे आरोप अनेकांकडून करण्यात आले. परंतु आरोपी माझ्या जवळचे होते आहेत, हे मी मान्य करतो परंतु मी त्यांची अजिबात पाठराखण केलेली नाही आणि करणारही नाही. वेळ पडल्यास पीडितेला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरू असे सांगत आ.क्षीरसागरानी विरोधकांच्या बिनबुडाच्या आरोपांना प्रत्युत्तर देत सर्व आरोप खोडून काढले आहेत.

दि.२७ जून २०२५ रोजी बीड शहरातील नामांकित उमाकिरण शैक्षणिक संकुलात एका अल्पवयीन मुलीवर प्राध्यापकांकडून लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा

(उर्वरीत पान २ वर)



### धनंजय मुंडेंना मंत्रिपद गेल्याच दु:ख असल्याने आकसातून त्यांचे आरोप

मस्साजोग प्रकरणात मंत्रिपद गमवावे लागल्याचे धनंजय मुंडेंना दु:ख आहे. त्या आकसातून ते आरोप करत आहेत. ज्याप्रकारे ते या प्रकरणात बोलत आहेत त्याचप्रकारे, त्याच आक्रमकतेने त्यांनी स्व.संतोष देशमुख प्रकरणातही बोलायला पाहिजे होते. धनंजय मुंडे हे सत्तापक्षात आहेत. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री हे ना.अजितदादा पवार आहेत ते त्यांचे नेते आहेत त्यांच्यावर त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे. ना. अजितदादा असला प्रकार अजिबात खपवून घेणार नाहीत. अशी भावनाही आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# अर्थसंकल्पाला पुरवणी मागण्यांचे ठिगळे

राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प कार्यान्वित होऊन तीन महिने पूर्ण होईपर्यंतच त्याला पुरवणी मागण्यांची ठिगळे जोडण्यास सुरुवात झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने तब्बल ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. वाढत्या पुरवणी मागण्यांमुळे 'नियोजन' नामक संकल्पनेलाच धक्के बसत आहेत आणि अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी कागदावरच राहू लागल्या आहेत.

राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प कार्यान्वित होऊन तीन महिने पूर्ण होईपर्यंतच त्याला पुरवणी मागण्यांची ठिगळे जोडण्यास सुरुवात झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने तब्बल ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अर्थतज्ज्ञ आणि विरोधक टीका करीत असले, तरी महायुती सरकारकडे असलेल्या भक्कम बहुमतामुळे या मागण्या मंजूर होतील; पण दिवसेंदिवस वाढत्या पुरवणी मागण्यांमुळे 'नियोजन' नामक संकल्पनेलाच धक्के बसत आहेत आणि अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी कागदावरच राहू लागल्या आहेत. अनिवार्य बाबींसाठी किंवा आपत्कालीन परिस्थितीत पुरवणी मागण्या मांडण्यास हरकत असण्याचे कारण नाही. मात्र, त्याचा आता पायंडाच पडू लागला आहे. यंदाच्या पुरवणी मागण्यांमधील मोठा हिस्सा हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सादर झाल्याचे ढळढळीत दिसते आहे. ही राजकीय अपरिहार्यतेपोटी आर्थिक शिस्तीशी केलेली तडजोडच म्हणावी लागेल.

पुरवणी मागण्यांमध्ये १९ हजार कोटी रुपयांच्या अनिवार्य खर्चाचा समावेश आहे, तर ३४ हजार कोटी रुपये कार्यक्रमाअंतर्गत आणि तीन हजार कोटी रुपये केंद्र सरकारच्या योजनांमधील हिश्शापोटी आहेत. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना मुद्रांकशुल्काचा परतावा, मुंबई मेट्रो आणि भुयारी मार्गांच्या प्रकल्पासाठी राज्य सरकारचा हिस्सा, साखर कारखान्यांना फरकापोटी कर्ज, अपूर्ण सिंचन प्रकल्प, जिल्हा मार्ग आणि पूल; तसेच श्रावणबाळ निवृत्तीवेतन आणि संजय गांधी निराधार योजना, एसटी सवलतींच्या खर्चाची प्रतिपूर्ती आणि पायाभूत सुविधा विकास आदी कामांसाठी या मागण्या आल्या आहेत. सरकारचे पैसे कोठे खर्च करावे, याचे प्राधान्यक्रम ठरवण्याचा आणि बदलण्याचाही सरकारला अधिकार आहे; पण प्रश्न असा की, तीन महिन्यांपूर्वी अर्थसंकल्प मांडताना या खर्चाचा विचार का झाला नाही? मुद्रांकशुल्काचा परतावा किंवा एसटीच्या सवलतींपोटीची रक्कम या बंधनकारक बाबी अर्थसंकल्प मांडताना विचारात न घेण्यामागील कारणे काय, याचे कोडे उलगडत नाही. नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद आवश्यकच आहे; पण कुंभमेळा हा अचानक येणारा योग नव्हे. त्यामुळे त्याच्याशी संबंधित आवश्यक खर्चाचे नियोजन राज्य सरकारच्या संबंधित विभागाने वेळीच केल्याचे दिसत नाही. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अचानक उद्भवणारे खर्च किंवा आपत्कालीन परिस्थितीत निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुरवणी मागण्यांची संकल्पना पुढे आली. मात्र त्यांचा अतिरेक होऊ लागल्याने मूळ अर्थसंकल्प दिवसेंदिवस अर्थहीन ठरू लागेल काय, अशी भीती वाटू लागली आहे. गेल्या काही काळात सर्वच विभागांना ही लागण होऊ लागली आहे. २०२१-२२च्या चार लाख ९४ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पानंतर एक लाख १७ हजार कोटी रुपयांच्या; तर २३-२४ मध्ये साडेपाच लाख कोटींच्या अर्थसंकल्पात ७६ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आल्या.

# विभागीय आयुक्त कार्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

राज्य शासनाच्या १५० दिवस कार्यक्रमा अंतर्गत तसेच प्रशासनातील कामकाज अधिक गतिमान, अचूक व पारदर्शक करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर एमकेसीएलचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी मार्गदर्शन केले. विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाला प्रारंभ झाला. यावेळी अपर आयुक्त विजससिंह देशमुख, डॉ. अनंत गव्हाणे, खुशालसिंह परदेशी, एमकेसीएल मराठवाडा विभाग मुख्य मार्गदर्शक बालकिशन बलदावा, विभागीय समन्वयक गजानन कुलथे, जिल्हा समन्वयक निलेश झाल्टे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त म्हणाले, कार्यालयीन कामकाजात योग्य पद्धतीने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढविल्यास नागरिकांना सेवा गतीने मिळण्यास मदत होईल. अधिकारी तसेच कर्मचारी यांनी आपल्या कामकाजात एआय तंत्राचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

एमकेसीएलचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम म्हणाले, कृत्रिम बुध्दीमत्ता हे तंत्रज्ञान वापरुन कार्यालयीन कामकाज कमी वेळात प्रभावीपणे करता येते. दैनंदिन प्रशासकीय कामकाजामध्ये कमी वेळेत प्रभावीपणे काम करण्यासाठी एखादे व्हीजन डॉक्युमेंट सारखे दस्तावेज अवघ्या काही मिनिटात तयार करण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर चांगल्याप्रकारे करता येऊ शकते. त्यासाठी काटेकोरपणे त्याच्याकडून काम करुन घेता आले पाहिजे, असेही ते म्हणाले.

श्री कदम यांनी संगणकीय सादरीकरण करतानाच काही प्रात्याक्षिक करुन दाखवून कार्यालयीन कामकाजामध्ये कृत्रिम बुध्दमत्तेचे महत्व प्रभावी असल्याचे सांगितले. चॅट जीपीटी, भाषिनी, डेमो एआय, हेड्रा, ग्रोक एआय, डीप सीक, जनरेटीव्ह एआय आदींचा वापर कार्यालयीन कामकाजामध्ये कसा करायचा त्याबाबत सविस्तर माहिती दिली. मजकूर टायपिंगसाठी गुगल डॉक्स, गुगल लेन्स, शुध्दलेखनाच्या चुका दुरुस्त करण्यासाठी ग्रामरली, त्याचबरोबर संगणकीय सादरीकरणासाठी एआय पीपीटी, प्रेझेंटेशन.एआय, आर्ट वर्कसाठी कॅनवा प याबाबतची माहिती दिली.

कार्यशाळेदरम्यान सहभागी कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष तांत्रिक साधनांचा वापर करून पाहिला. ई-मेल लेखन, नोंदी ठेवणे, दस्तऐवजांची मांडणी, भाषांतर व अहवाल लेखन यासाठी एआयचा प्रभावी वापर कसा करता येतो याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यावेळी अपर आयुक्त विजयसिंह देशमुख यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात एआय तंत्राचा वापर वाढविण्यासाठी एक टिम तयार करण्यात येणार असून यामध्ये प्रत्येकाचा सहभाग महत्वार्चा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.आभार तहसीलदार अरूण पावडे यांनी मानले.

## फळपिक विमा योजनेस अर्ज करण्यासाठी

# चार दिवसांची मुदतवाढ- कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

मुंबई : हवामान आधारित फळपिक विमा योजनेच्या मर्यादित कालावधीत केंद्र सरकारने मुदतवाढ करून राज्यातील फळपिक शेतकऱ्यांना दिलासा दिल्याची माहिती कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या योग्य समन्वयामुळे पिक विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना आता ६ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करता येणार असल्याचे कृषिमंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले.

हवामान आधारित फळपिक विमा योजनेंतर्गत मृग बहार २०२५ मध्ये द्राक्ष, पेरू, लिंबू, संत्रा, चिकू, मोसंबी या पिकांसाठी विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम दिनांक ३० जून २०२५ होती, मात्र २७ जून २०२५ पासून आधार संकेतस्थळाबाबत समस्या असल्याने विमा अर्ज करण्यामध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी शेतकरी बांधवांकडून येत होत्या. याबाबत केंद्र सरकारशी योग्यवेळी समन्वय साधल्याने एकूणच परिस्थितीचा विचार करून दिनांक ३ ते ६ जुलै २०२५ असे एकूण चार दिवस वरील पिकांकरिता फळपिक विमा योजनेत भाग घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी केंद्र शासनाच्या ु.षिलू.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट देऊन विमा योजनेचा अर्ज करावा, असे आवाहन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले आहे.

# पुनर्रचीत हवामान आधारित फळपिक विमा भरण्यास मुदतवाढ

बीड : पुनर्रचीत हवामान आधारित फळ पिक विमा योजना मृग बहार सन २०२५ बीड जिल्ह्यामध्ये बजाज जनरल इन्सुरंस कंपनी मार्फत राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मृग बहार सन २०२५ मध्ये पेरू, लिंबू, संत्रा, चिकू, मोसंबी या पिकांसाठी ०६ जुलैपर्यंत फळ पीक विमा योजनेत भाग घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी याची नोंद घेऊन केंद्र शासनाचे विमा योजना संकेतस्थळ ु.षिलू.सीं.ळप वर अर्ज करून सहभागी व्हावे व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

# आदित्य कृषि महाविद्यालयाच्या कृषीदुतांकडून राक्षसभुवन येथे कृषीदिनानिमित्त वृक्ष लागवड

बीड ।प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषीदूत ,अमेय गावंडे, स्वप्निल वाघमोडे, विशाल गरुड, सौरव शेंडे, गणेश जंजिरे, धीरज तायनाक, गौरव खराडे, महेश गडदे, विश्वतेज दुपडे, हरी जंगमवार यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव २०२५-२६ अंतर्गत राक्षसभुवन (देवीचे) ,गावात ०१ जुलै रोजी कृषी दिन साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राक्षसभुवन (देवीचे) येथील विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने झाली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचे कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी योगदान यांविषयी कृषीदुतांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर कृषी दिनाची पार्श्वभूमी, कृषी दिनाचे महत्त्व आणि कृषिप्रधान देशात कृषी दिन एक पावन पर्व म्हणून का ओळखला जातो या संदर्भात माहिती दिली. कृषी दिनानिमित्त कृषी दुतांकडून गावामध्ये वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषी दुतांनी गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले तसेच झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला. या कार्यक्रमासाठी गावचे सरपंच भगवान ढपाळ, उपसरपंच भागवत खाखरे, कृषी सहाय्यक श्रीमती सीमा गव्हाणे मॅडम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राक्षसभुवन (देवीचे) च्या मुख्याध्यापिका खेडकर मॅडम, इतर शिक्षक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते. कृषी दूतांच्या या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य कल्याण अपेट, प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक प्रा. वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते व महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

## टीसी हरवला आहे

नीरज नवनाथ नागरगोजे राहणार सावरगाव सोने, ता. पाटोदा जि. बीड या नावाचा १२ वी पास असलेला टीसी सावरगाव सोने ते पाटोदा प्रवास दरम्यान हरवला आहे.

सापडल्यास संपर्क - ८८०५०४१०५६

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ५४० / २०२५**
**गंगुबाई भ्र. शंकर कारके - विरूध्द - निरंक**
**(मार्फत -ॲड. पी. एम. पटेकर )**

ज्याअर्थी मयत नामे मंडाबाई पि. शंकर कारके हे दिनांक ०७.०६.२०२५ रोजी गोळेगांव, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार १. गंगुबाई भ्र. शंकर कारके वय ९० वर्षे धंदा शेती - रा. गोळेगांव ता. गेवराई जि. बीड शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे मंडाबाई पि. शंकर कारके गोळेगांव, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : ०५.०८.२०२५

**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

## पान १ वरून...

**रूपालीताई, पिडीतांना...**

तळागाळात काम करणारी एकही महिला राज्य सरकारला दिसली नाही का ?

महाराष्ट्र सरकारचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना आयोगाच्या अध्यक्षांनी विधिमंडळामध्ये महाराष्ट्रातील पीडित महिलांना न्याय मिळावा यासाठी सरकारकडे शिफारसी करणे, कायद्यात दुरुस्ती करणे, महत्वपूर्ण सूचना देणे हे कर्तव्य असताना अधिवेशन काळात तिथे न थांबता महाराष्ट्रामध्ये राजकीय नौटंकी करत ही भ्रमंती कशासाठी

राज्य महिला आयोग केवळ नावालाच आहे का ? या ठिकाणी कितीतरी पीडित महिलांचे प्रश्न आजही प्रलंबित आहेत. त्यांना न्याय मिळाला नाही उलट काही आलेल्या तक्रारी मधून संबंधित महिलेला न्याय न देता ज्यांच्या विरुद्ध तक्रार आहे त्यांनाच सावध करण्याचे काम केले जाते का ?

महिलांच्या प्रश्नावर चाकणकर बाई तुम्ही जीवावर उदार होऊन कधीही काम केले नाही मग तुम्हाला सुरक्षा कशासाठी हवी ?

बीड जिल्ह्यामध्ये मागील सहा महिन्यात महिलांवरील अत्याचारांच्या घटना पोलीस ठाण्यामध्ये तब्बल ७८ नोंद झाल्या आहेत यामध्ये जवळपास ५० केसेस या पोक्सो अंतर्गत आहेत महाराष्ट्रात ही आकडेवारी मागील सहा महिन्यांमध्ये झपाट्याने वाढलेली आहे यापैकी किती महिलांना न्याय देण्यासाठी आपण प्रामाणिकपणे भूमिका बजावली.

मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्यानंतर त्यांची कन्या वैभवी वर मोठे संकट कोसळले होते तिचे अश्रू पुसावेत असे कधी वाटले नाही का ?

रूपाली चाकणकर यांनी आयोगाचे अध्यक्ष पद स्वीकारल्यापासून आतापर्यंत आयोगाकडे आलेल्या किती तक्रारींचे प्रत्यक्षात गुन्ह्यामध्ये रूपांतर झाले ? किती प्रकारचा आयोगाने पुढाकार घेऊन पिढीतील न्याय दिला याची माहिती आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जगजाहीर करावी कारण आज आहे हजारो महिला मुली न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत

एकीकडे महाराष्ट्रामध्ये महिलांच्या अत्याचार प्रकरणांमध्ये मागील वर्षभरात झपाट्याने वाढ होत आहे. दुसरीकडे आयोगाच्या अध्यक्ष स्वतःकडे लक्ष वेधण्याकरिता यंत्रणेचा आणि पैशाचा अपव्य करत आहेत. वास्तविक याची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणे नीतिमत्तेला धरून होते मात्र त्यांनी असे केले नाही.

त्या कुठल्या अदृश्य शक्तीच्या आधारावर तुपाशी आहेत ? आणि महाराष्ट्रातील महिला न्याया करता उपाशी आहेत ?

बीडसह बहुतांश बस स्थानके नव्याने उभारण्यात येत आहेत. राज्यात स्तनदा मातासाठी एसटी बस स्थानकावर हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आलेले होते ते नवीन बांधकामांमध्ये दिसून येत नाहीत. त्यामुळे त्यांना मातांची कुचंबना होत आहे ती कधी थांबणार ?

बदलापूर प्रकरणानंतर खाजगी क्लासेस करता मंत्री दादा भुसे यांनी काही शॉप दिल्या होत्या त्याच्यावर अंमलबजावणी मात्र झिरो आहे.

आज पुण्यातील मुली महिला जीव मुठीत घेऊन जगत आहेत. पुणे आयोगाच्या कार्य कक्षेत येत नाही का ?

यासह विविध प्रश्न घेऊन शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या ॲड हेमाताई पिंपळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना बीडमध्ये आल्यावर जाब विचारणार आहेत. त्यामुळे आता त्यांच्यावर प्रशासनाची करडी नजर असल्याने नेमकं काय घडतं याकडे लक्ष वेधणार आहे.

**पालकमंत्री अजित पवारांच्या....**

युवकांना रोजगार, स्वयंरोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य विकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी या वर्षाच्या सुरुवातीला घेतला होता. त्यासाठी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनी बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करणार आहे. कंपनीने तशा आशयाचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. या नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाणार आहे. यामुळे बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या निर्णयक्षम कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्वीकारल्यापासून त्यांनी जिल्ह्यासंदर्भात धडाडीने निर्णय घेण्यास आणि नियोजित वेळेत यशस्वी अंमलबजावणी करण्यास सुरुवाता केली आहे. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राला 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करण्याची तयारी दर्शविली. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून उर्वरित खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीआयआयआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे. 'सीआयआयआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल जिल्ह्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६७/२०२५**
**गोकुळ बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस / निरंक**
**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे)**

ज्याअर्थी मयत नामे १ . बप्पाजी उर्फ बप्पासाहेब पि. रामचंद्र धस हे / हया दिनांक ०८/१२/२०२३ रोजी मौजे तळणेवाडी ता गेवराई जि. बीड २. कमलबाई भ्र. बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस हे / हया दिनांक १०/०८/२०२१ रोजी रा. तळणेवाडी ता गेवराई जि. बीड मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार १. गोकुळ बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस वय . ४३ वर्षे धंदा :शेती रा. तळणेवाडी ता. गेवराई जि. बीड माणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बप्पाजी उर्फ बप्पासाहेब पि. रामचंद्र धस व नामे कमलबाई भ्र. बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०४/०८/२०२५

**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

# जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल जास्त

## बीड मध्ये अनाधिकृत शाळांवर कारवाई होणार का? - मनोज जाधव

शाळा तपासून अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विभागाने मागवली

बीड (प्रतिनिधी)

राज्यातील अनाधिकृत शाळांबाबतची माहिती सादर करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने आदेश निर्गमित केले असून आता जिल्ह्यात अनाधिकृत शाळा आढळुन आल्यास सदरिल शाळेवर शासन निर्णय दि.१८ डिसेंबर २०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे. अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचेकडुन त्यांचे बीट/केंद्र मधील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जियो टॅग फोटो काढणे आणि विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ ०७ जुलै पर्यंत सदरिल माहिती व अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल आणि इतर शाळा जास्त आहेत. तेव्हा शिक्षण विभागाला अनाधिकृत शाळा सापडणार का? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का ? असा सवाल शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केला आहे.

राज्यात मागील काही वर्षांमध्ये राज्य शासनाची कोणतीही मान्यता न घेता अनाधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसूल करत असतात. या शाळांवर कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालनालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात तपासण्या करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यात देखील बऱ्याच अनाधिकृत शाळा असल्याची भीती व्यक्त होत आहे. परंतु जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई केली जाईल का ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी करण्याचे कागदी घोडे न नाचवता संबंधित



शाळांवर कारवाईच करावी. अशीही मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी जॉन्सन बनले निक्षय मित्र !

**प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान**

बीड (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन निक्षय मित्र बनले. जिल्ह्यातील पाच क्षय रूग्णांना जिल्हाधिकारी यांनी सहा महिन्यांसाठी दत्तक घेत त्यांना आज पोषण कीटचे वाटप केले. राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय टीबी मुक्त भारत अभियान, टीबी फोरम व टीबी कोमोर्बीडीटीच्या जिल्हा समन्वय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांच्या



**जिल्ह्यातील इतरांनीही निक्षय मित्र बनण्याचे आवाहन**

अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात झाली.

जिल्ह्यात एकूण एक हजार २३९ क्षय रुग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी ३५० रूग्णांना निक्षय मित्र यांच्यामार्फत निक्षय पोषण आहार किटचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षयरुग्णांना निक्षय पोषण आहार कीट उपलब्ध करून देण्यासाठी विविध घटकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्री. जॉन्सन यांनी केले.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेशकुमार माने, वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल चव्हाण, आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## ग्रामपंचायत गोरी गंधारी येथे नवनियुक्त ग्रामविकास अधिकारी मारक यांचा सत्कार

अंबड (प्रतिनिधी)

तालुक्यातील मौजे गोरी गंधारी येथील ग्रामपंचायत कार्यालय नवनियुक्त ग्रामविकास अधिकारी श्री मारक यांनी पदभार स्वीकारल्या बद्दल ग्रामविकास अधिकारी श्री मारक यांचा साल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी ड.नारायण खराद,श्री डि.ए.जाधव सर,श्री रमेश भाऊ नेवारे,श्री भगवान अडागळे,श्री विलास म्हस्के,श्री बहीर सर,श्री राम अडागळे,श्री भगवान मोहीते,श्री बळीराम थोटे,श्री विनोद तिळवणे,श्री दत्ता तिळवणे, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारी एकमेव शाळा - बेडसकर

मस्साजोग (प्रतिनिधी)

विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारे जिल्ह्यातील एकमेव शाळा म्हणून बीड जिल्ह्यात सानेगुरुजी निवासी विद्यालय केज ने शिक्षण क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. आज नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके शालेय दप्तर चे वाटप करण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केज तालुका गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य / मुख्याध्यापिका डॉ कविता गित्ते ,आणि इतर मान्यवर हरिभाऊ पाटोळे , उत्तम मोती, बाबासाहेब चाटे, यांच्या उपस्थितीत



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी शाळेतील प्रवेशित सर्व निवासी विद्यार्थ्यांना वह्या , पुस्तकं, दप्तर ,इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्या हस्ते करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यांचे वाटप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना बेडसकर म्हणाले की विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक साहित्य अतिशय दर्जेदार व चांगल्या प्रतीचे आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात साडेसातशे मुलांचं निवासी वसतिगृह चालवणं व त्यांना दर्जेदार सुविधा देणे हे सोपे काम नाही. खरंच सदर शाळा व वसतिगृह हे अतिशय वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी चालतं याचा केज तालुक्याला अभिमान आहे. फक्त वस्तीग्रह व शाळा चालवायची म्हणून सदर शाळा चालत नसून एक मॉडेल स्कूल सध्या बीड जिल्ह्यात साने गुरुजी आहे असाही मत त्यांनी व्यक्त केलं. त्याबद्दल संस्था आणि शाळा प्रशासनाचे कौतुकही केले तसेच मुलांना या नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा सिरसाट यांनी केले तर आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक हरिभाऊ पाटोळे यांनी आभार मानले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध व आनंददायी वातावरणात पार पडला.

# कोंडवाडा बंद असल्याचे शेतकरी आक्रमक ; ग्रामपंचायत गेट ला बांधले जनावरे....

## ग्रामसेवक आल्यानंतर सोडवला प्रश्न ; कर्मचारी तोऱ्यात

तलवाडा (प्रतिनिधी)

मोकाट जनावरांना आळा घालण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर कोंडवाडा असतो परंतु तलवाडा ग्रामपंचायत लागत असणारा हा जनावरांचा कोंडवाडा मागील चार वर्षापासून बंद असल्याने मोकाट जनावरे कोठे न्यावीत असा प्रश्न शेतकऱ्या समोर उभा होता .अनेक वेळा ही जनावरे शेतकरी यांनी धरून सोडून दिले परंतु उभ्या पिकाची नासाडी होत असल्याने मोठी आर्थिक झळ त्यांना बसत होती.याकडे पंचायत प्रशासनाचे लक्ष नसल्याने यावर काहीच कार्यवाही होत नव्हती ही बाब वारंवार शेतकऱ्यांनी ग्रामसेवक आणि सरपंच यांच्या निर्दशनास आणून दिली परंतु काहीच फरक झाला नसल्याने दिनांक ३ जुलै रोजी एका शेतकऱ्याने शेतातील पिकाची नासाडी केलेल्या मोकाट जनावरांना धरून त्यांना ग्रामपंचायत च्या कोंडवाडा याठिकाणी आणले परंतु कोंडवाडा बंद असल्याने आक्रमक झालेल्या शेतकऱ्याने म्हशीचे वाघारू चक्क ग्रामपंचायत कार्यालयाच्या गेटलाच बांधल्याने ग्रामपंचायत प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला .यावेळी ग्रामसेवक हजर




नव्हते त्याने आक्रमक शेतकऱ्यांनी जनावरे कोंडवाड्यात टाका अन्यथा गेट उघडू देणार नाही अशी भूमिका घेतल्याने काहीकाळ मी मी मानणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.ग्रामसेवक यांनी तलवाडा याठिकाणी येऊन सदरील प्रश्न मार्गी लावत कर्मचारी यांच्याकडून कोंडवाडा खुला करून घेतला तेव्हा हे प्रकरण निवळले. यामध्येच दुसराच एक वाद त्याठिकाणी उद्भवला होता तो ही ग्रामसेवक यांनी तलवाडा येथील काही सामाजिक काम करणारे युवक तथा तलवाडा ग्रामपंचायत चे उपसरपंच यांच्या मध्यस्थीने प्रकरण मिटवले.परंतु ग्रामपंचायत चां कारभार हा अत्यंत भ्रष्टयुक्त आणि अनियमित पणाने चालत असल्याने याठिकाणी नव्याने आलेले ग्रामविकास अधिकारी आणि प्रशासक हे सुधारतील का हे येत्या काळात पहावे लागेल नसता त्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे

# अभि नहीं तो कभी नहीं हे लक्षात ठेवून आझाद मैदानावरील आंदोलनात बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन

बीड (प्रतिनिधी)

राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्प्यासाठी लागणारा निधी मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती महाराष्ट्र राज्य व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. तसेच बुधवार दि.०२ जुलै रोजी शिक्षक आमदार आणि पदवीधर आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार निधी उपलब्ध करून द्या या मागणीचे निवेदन दिले.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षक व पदवीधर आमदारा सोबत तात्काळ निधी संदर्भात बैठक घेऊन मार्ग काढु सांगितले आहे. त्यामुळे सर्व आमदार त्यांच्या परीने प्रयत्न करीत आहेत. दुसरीकडे आंदोलनस्थळी शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची गरज आहे. तसेच शिक्षक समन्वयक संघाने ८ व ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. या बंदमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व शाळेचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळा बंद करून मोठ्या संख्येने आंदोलनाला उपस्थित रहावे असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले







आहे.मुंबई येथील आझाद मैदानात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर,उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर ,उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर,जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर, माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर ,परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

## श्रीमती किरण चौरे मॅडम आज बीड आकाशवाणीवर

बीड (प्रतिनिधी)

शहरातील यशवंत विद्यालयातील आदर्श उपक्रमशील शिक्षिका श्रीमती किरण शेषराव चौरे (पाटोळे ) यांचे बीड आकाशवाणी केंद्रावर दि. ४ जूलै २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ठिक ११:०० वा. महिला विश्व या सदरात 'हुंडा प्रथा एक सामाजिक कलंक' या ज्वलंत विषयावर विचार प्रसारित होत आहेत. त्याचा श्रोत्यांनी लाभ घ्यावा



आज समाजात हुंडा प्रथेमुळे,विवाह संस्था अडचणी येत असून, अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत आणि त्या समस्यांचे दीर्घकालीन परिणाम समाजाला सोसावे लागतात असे विचार त्यांनी सांगितले आहेत. त्यांच्या उपक्रमाबद्दल जेष्ठ शिक्षक नेते श्री उत्तम पवार सर श्री रवींद्र दळवी साहेब, शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री गणेश वाघ सर, सचिव श्री नामदेव वाघ सर,मुख्याध्यापक श्री धुमाळ सर सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

### शासकिय धान्य गोदामातील हमालांना ५ महिन्यापासून मजूरी नसल्याने

## हमालांचे बेमूदत कामबंद आंदोलन सुरु

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील २३ शासकिय धान्य गोदामातील हमालांना पुन्हा पाच महिने काम करुन मजूरी नाही कंटाळून शेवटी संघटनेने काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतल्याने ३ जुलै पासून जिल्ह्यातील २३ गोदामातील २०० हमालांनी बेमूदत कामबंद आंदोलन सुरु केले असल्याची माहिती राजकुमार घायाळ यांनी दिली.

पाच महिन्याच्या मजूरीसह महागाई निर्देशांकाचा फरक,आनंदाचा शिधा किटची दोन वर्षापूर्वी काम केले त्याची हमाली अद्याप दिली नाही ती तात्काळ देणे इत्यादी मागण्याचा आग्रह हमालांनी शासनाकडे केला आहे.याबाबत संघटनेच्या प्रतिनिधीनी राज्य शासनाकडे संपर्क केला असता सदर कामासाठी बजेट नसल्याने बीड सह राज्यातील सर्व जिल्ह्यात ३ ते ५ महिन्या पासून राज्यातील अनेक हमालांना मजूरी मिळाली नसल्याने अनेक जिल्ह्यातील हमालांनी कामबंद आंदोलनचा निर्णय घेतला आहे.त्यामूळे राज्यातील काही जिल्ह्यात काम बंद आंदोलन सुरु करण्यात आले आहे.या बाबत तातडीने निर्णय न झाल्यास राज्याव्यापी कामबंद आंदोलनाचा निर्णय घेण्यात येईल.असा इशारा राजकुमार घायाळ उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ यांनी दिला आहे.

पान १ वरून...

**अर्वाच्य भाषेत अधिकाऱ्याला ...**

प्रस्ताव मंजूर करा, म्हणून जोरजोरात ओरडून आरेरावी केली. दिनांक २३ रोजी औरंगाबाद येथे बैठक असलेल्या ठिकाणी येऊन सकाळी ११ ते पाच वाजेपर्यंत थांबून दिवसभर मागे फिरला. दि. २५ रोजी कार्यालयात येऊन अपंग प्रस्ताव मंजूर करा,असे म्हणून अरेरावी केली. तर आपण यापूर्वीच्या अधिकाऱ्यांचे व्हिडिओ तयार केलेले असून त्यांचे घोटाळे उघडकीस आणले आहेत. माझ्याकडे पिस्टल परवाना आहे, असे म्हणून एकटक बघून अर्वाच्य भाषा वापरली. दिनांक २ जून रोजी कार्यालयात येऊन, मोठ्याने ओरडून, लज्जास्पद वर्तन केले. कार्यालयाच्या दालनात अर्वाच्य अरेरावी केल्यानंतर बाहेर कक्षात असलेल्या कनिष्ठ अधिकाऱ्याला ही उलट सुलट बोलून अर्वाच्य भाषेत हातवारे करून लज्जास्पद भाषा वापरून धमकावले. सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं. ३६४/ २०२५ कलम ७८, ७९, २२१ बीएनएस २०२३ नुसार विनयभंग व काम करून घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही. एस. मोरे हे करत आहे.

सादेक मुलानी- इनामदारचे रिवाव्हर लायसन रद्द करण्याचे एसपी'चे पत्र

सादेक बाबामिया मुलानी - इनामदार रा. कसबा, धारूर यांच्यावर पोलिस ठाणे, धारूर येथे दिनांक ११ मार्च २०२५ रोजी गु.र.न. ७१/२०२५ कलम १८९ (२), १९०, ११५, (२) बीएनएस सह कलम ११०, ११७ महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे उल्लंघन केले म्हणून गुन्हा दाखल आहे. तसेच शस्त्र परवानाधारक सादेक मुलानी/ इनामदार हे शस्त्र परवानाचे उल्लंघन करून शस्त्रासह फोटो वेगवेगळ्या अंगलमध्ये काढून लोकांचे मनामध्ये भीती निर्माण होईल, याहेतूने सोशल मीडियावर फोटो व्हायरल करीत असल्याचे दिसून आले आहेत. यामुळे यामुळे प्रभारी अधिकारी, पोलिस ठाणे धारूर यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी, केज यांचे मार्फत गुह्याचे अनुषंगाने शास्त्रपरवाना रद्द करण्यासाठी प्रस्ताव पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता.सदर अहवालाची पोलिस अधीक्षक, बीड यांनी तपासणी केली. यामध्ये सादिक बाबामिया मुलानी/ इनामदार विरुद्ध शस्त्र परवाना मिळाल्यानंतर गुन्हे दाखल असुन भविष्यात शस्त्र परवानाद्वारे मिळालेल्या शास्त्राचा आणखी मोठ्या स्वरूपाचा स्वरूपाचा गुन्हा करू शकतात, असा स्वयं स्पष्ट अहवाल देऊन शस्त्र परवाना रद्द करणेची शिफारस केली आहे.त्यामुळे सादेक बाबामिया मुलानी/ इनामदार यांचे शस्त्र परवाना रद्द होणार आहे.

**बीड जिल्ह्यात शिवभोजन....**

संगनमताने भ्रष्टाचार होत असल्याचे स्पष्ट होत आहे यामुळे याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी होणे गरजेचे आहे.

बीडमधील शासकीय विश्रामगृहाजवळ असलेल्या उडपी हॉटेलमध्ये एकाच थाळीसमोर जवळपास ५० जणांना बसवून फोटो काढण्यात आले. या फोटोंचा उपयोग करून अधिक थाळ्यांची नोंद करून सरकारकडून अधिक अनुदान मिळवण्याचा प्रयत्न यांच्याकडून होत आहे. या प्रकरणाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.महाराष्ट्र सरकारने ०१ जानेवारी, २०२० रोजी राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन सुरू करण्याचा निर्णय घेतला. या योजनेला शिवभोजन थाळी असे म्हटले जाते. २६ जानेवारी २०२० पासून ही योजना सुरू झाली. या शिवभोजन थाळीमध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण व १ मूद भात देण्यात येतो. ही योजना सुरू करण्यासाठी शिवभोजन नावाचे ॲपही तयार करण्यात आले. शिवभोजन थाळ्या वितरित करण्यापूर्वी लाभार्थी व्यक्तीचा फोटो घेणे बंधनकारक आहे. मात्र, फोन नंबर घेणे ऐच्छिक आहे. केंद्रचालक पवर शिवभोजन थाळी योजनेचा मेन्यू प्रसिद्ध करू शकतो. संबंधित केंद्राच्या बाहेरही बोर्डवर तो लावला जातो. शिवभोजन योजना सुरू झाल्यापासून २७ मार्च २०२४ पर्यंत एकूण १८,८३,९६,२५४ शिवभोजन थाळ्या लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वास्तविक इतक्या मोठ्या प्रमाणात शिवभोजन थाळीचा लाभ खऱ्या गरजवंत लाभार्थ्यांनी घेतला आहे का ? हा प्रश्न कायम प्रश्नच राहणार आहे.

राज्यात स्थिती काय..?

शिवभोजन थाळी योजनाचा लाभ कोणालाही घेता येतो. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार, सध्या शिवभोजन योजनेचा प्रतिदिन इष्टांक २.०० लक्ष इतका आहे. राज्यात १९०४ शिवभोजन केंद्रे सुरू असल्याचे म्हटले आहे. शिवभोजन केंद्रे सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्यात आली आहेत. विशेष म्हणजे सर्व शिवभोजन केंद्रांच्या १०० मीटर परिघामध्ये जिओ फेंन्सिग सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शिवभोजन केंद्रचालकांना शिवभोजन केंद्राच्या १०० मीटर परिघामध्येच शिवभोजन योजनेचे व्यवहार करता येतात. तरी सुद्धा या योजनेविरोधात तक्रारी येत आहेत. हे निश्चितच गंभीर आहे.

**उमाकिरण प्रकरणात लवकरच..**

दाखल झाला. या प्रकरणातील आरोपी प्रा.विजय पवार हे आ.संदीप क्षीरसागरांच्या जवळचे आहेत. आरोपींवर आ.क्षीरसागरांचा राजकीय वरदहस्त आहे. आरोपीना आ.क्षीरसागरानी मदत केली. अशा अनेक आरोपपूर्ण बातम्यांनी सनसनी माजवली होती. मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनातही हा मुद्दा चर्चेचा ठरला. अनेक आरोप झाले. त्यानंतर आता आ.संदीप क्षीरसागर मैदानात उतरले असून त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत झालेल्या सर्व आरोपांना प्रत्युत्तर दिले. ते या आरोपांना प्रतिउत्तर देताना म्हणाले की,आरोपी हे माझ्या जवळचे आहेत हे मी अजिबात नाकारत नाही. परंतु मी त्यांच्या या प्रकरणात अजिबात पाठराखण केलेली नाही, आणि करणारही नाही. पीडित भगिनीला न्याय देण्यासाठी वेळ पडली तर रस्त्यावर उतरू. पोलीस योग्य दिशेने तपस करत आहेत. आरोपीना तातडीने अटक करण्यात आली आहे. मी सातत्याने पोलीस प्रशासनाशी चर्चा करून माहिती घेत आहे. विरोधकांनी, माझे सीडीआर तपासण्याची मागणी केली आहे. त्यालाही मी सहमत असल्याचेही आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

# कचनेर येथे कृषिदुतांकडून वृक्षारोपण



जालना ।प्रतिनिधी

कचनेर ता.जि.छ.संभाजीनगर येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालय कचनेर, येथे हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी आंबा, चिंच, जांभूळ इत्यादी प्रकारची विविध वृक्ष रोपांची लागवड ग्राम महसूल अधिकारी श्री संजय थुबे , ग्रामसेवक श्री आहेर,सरपंच श्री.अंकुशराव पतपुरे व प्राचार्य निकम यांच्या हस्ते करण्यात वृक्षारोपण करण्यात आले.वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत येणाऱ्या कृषि महाविद्यालय बदनापुर येथील विद्यार्थी ग्रामीण जागरूकता कार्यानुभन कार्यक्रम आणि कृषि-औद्योगिक संलग्नता उपक्रम अंतर्गत कचनेर ता.जि. छ. संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. या उपक्रमाचे आयोजन कृषिदूत किरण चौधरी,गौरव पवार,नामदेव मद्रे,वैभव टेहरे, व करण उबाळे यांनी केले.शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर-कर्मचारी तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.या उपक्रमासाठी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ डि.के. पाटील, डॉ.एन.डी.देशमुख, व डॉ.एस.जे. सुपेकर यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

# खंडोबा मंदीर ते स्मशानभूमी रस्ता निकृष्ट दर्जाचा घुंगर्डे हादगांव ग्रामस्थांचे ग्रामविस्तार अधिकारीला निवेदन

## चौकशी करण्याची केली मागणी

**अंबड ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील घुंगर्डेहादगाव येथील खंडोबा मंदीर ते स्मशानभूमी पर्यंत झालेल्या रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. घुंगर्डेहादगाव येथील खंडोबा मंदीर ते स्मशानभूमी सिमेंट रस्त्याचे एक महिन्यापुर्वी काम झाले परंतु संबंधित गुत्तेदाराने हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. इस्टीमेंट नुसार काम झाले नाही, रस्त्याच्या कामात सिमेंट व खडी कमी प्रमाणात वापरण्यात आली आहे.नागरिकांनी ग्रामविस्तार अधिकारी के.के. कल्याणकर यांना निवेदन देऊन निवेदनात रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशी करण्यात यावी, कामाचे बील देऊ नाही नसता ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.**निवेदनावर गजानन शिंगटे, निवास मस्के, शरद परीहार, संदीप परीहार, भारतसिंग पवार, शारवण सिंग ठाकुर, संदीप पवार, प्रल्हाद शिंदे, किशोर पवार, नारायण जोडणार, संतोष काकडे, संभाजी मोटे, किसना थोरात, किसना चोरमले, पमा महाराज परीहार, हरून शेख, अर्जुन जाधव, सुरज मस्के, बंडु शिंगटे , गोटया जोडणार सह आदी नागरीकांच्या सह्या आहेत.शहागड : घुंगर्डेहादगाव येथील निकृष्ट दर्जाचे रस्त्याच्या कामाची चौकशी करण्याची मागणी करतांना ग्रामस्थ; दुसऱ्या छायाचित्रात महिनाभरात उखडलेला सिमेंट रस्ता



# पंतप्रधानांचे क्षयरोग मुक्त भारत अभियान अंतर्गत बीड जिल्हा क्षयमुक्त करण्याचा निर्धार

## राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी

दि.०३ जुलै २०२५ रोजी राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय टी.बी. मुक्त भारत अभियान, टीबी फोरम व टीबी को-मोर्बीडीटीच्या जिल्हा समन्वय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली प्रगती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे संपन्न झाली.



बैठकी दरम्यान प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान उपक्रमांतर्गत विवके जॉन्सन (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी, बीड यांनी निक्षय मित्र म्हणुन ५ क्षयरुग्णास निक्णय पोयण योजनेसाठी ६ महिन्यासाठी दत्तक घेऊन त्यांना पोषण आहार किटचे वाटप केले. यावेळी जितीन रहमान (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड, डॉ. उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बीड, डॉ. संजय राऊत जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय बीड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. महेशकुमार माने जिल्हा क्षयरोग अधिकारी बीड, डॉ. अमोल चव्हाण वैद्यकीय अधिकारी, स्वा.रा.ति. वै. महा. अंबाजोगाई, तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमांसाठी उपस्थित होते.राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत निक्लयमित्र बनुन क्षयरुग्णांना सामुदायीक सहाय्य हा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा एक प्रमुख उपक्रम आहे. जिल्हयात एकुण १२३९ क्षयरुग्ण उपचारवर आहेत. त्यापैकी ३५० क्षयरुग्णास ६ महीन्याकरिता निक्शयमित्र यांच्या मार्फत दत्तक घेण्यात आलेले आहे व त्यांना तिक्शय पोषण आहार किटचे वाटप केले आहे. मा. श्री विवके जॉन्सन (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी, बीड यांनी जिल्हयातील उर्वरित ८८९, क्षयरुग्णांना दत्तक घेण्यासाठी अवाहन केले आहे. ज्याद्वारे क्षयरुग्णांना अतिरिक्त सहाय्य मिळावे यासाठी समाजातील विविध भागधारक (सहाकारी, कॉर्पोरेट, निवडुन आलेले प्रतिनिधी, अशासकीय संस्था (छत्रत्नी), व्यापारी संघटना व वैयक्तीक संख्या) यांनी निक्णयमित्र म्हणून क्षयरुग्णांस दत्तक घ्यावे व त्यांना निक्शय पोषण आहार भत्ता देण्यात यावेत.तरी ज्यांना यामध्ये सहभागी होऊन सहाय्य करायचे आहे त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र बीड (जिल्हा रुग्णालय बीड)

# खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केले नाथांच्या पालखी रथाचे सारथ्य




जालना ।प्रतिनिधी

जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार (२ जुलै) शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांच्या पालखी रथाचे बार्शी तालुक्यातील अरण येथे दर्शन घेतले आणि नाथांच्या पालखी रथाचे सारथ्य केले. यावेळी त्यांनी नाथांच्या चरणी लीन होत भरपूर पाऊस पडू दे, बळीराजासह सगळी जनता सुखी राहुदे, असे साकडे घातले. व जालना लोकसभा मतदार संघातील वारीतील अनेक दिंड्यांना भेटी दिल्या. याप्रसंगी पैठणचे रविंद्र काळे, संदीप बोरसे, भाऊसाहेब जगताप, सदाशिव विटेकर, दिंडी चालक नाथ वंशज रघुनाथ बुवा गोसावी, योगेश बुवा गोसावी, पप्पुराज ठुबे, शिवाजी ढाकणे, भाऊसाहेब गवळी, सावता गाडेकर, कैलास वाघ, विठ्ठल कोरडे, संतोष मेटे, बाबुराव डकले, पंढरीनाथ जाधव, मुकेश चव्हाण, ज्ञानेश्वर जाधव ,जयप्रकाश दादा चव्हाण, राम सिरसाठ, बाळासाहेब वाकुळणीकर, अरूण पैठणे, विजय गव्हाणे, गणेश कोळकरआदींची उपस्थिती होती.

# आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा

बीड।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण, पीसीपीएनडीटी, फ्लोरेसीस, मौखिक आरोग्य या आरोग्य विभागांच्या कार्यक्रमांसह, रुग्ण कल्याण समिती, १०८ रुग्णवाहिका, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य, आयुष्यमान भारत आदी योजना, आरोग्य विभागाकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज घेतला.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात हा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेशकुमार माने, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमृता मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी आदींसह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राऊत व डॉ. गंडाळ यांनी आरोग्य विभागांतर्गत सेवा देण्यात असलेल्या विविध सेवांचा तपशील यावेळी सादर केला. आरोग्य सेवा देत असलेले सर्व कार्यक्रम प्रमुख यांनी आपापल्या विभागातील कामकाजांबाबत सविस्तर माहिती सादर केली.

# बीडमध्ये 'सीट्रिपलआयटी'ला जागेसह निधी देण्याचा निर्णय

अजितदादांमुळे बीड जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या पुढाकारामुळे या महत्त्वाकांक्षी 'सीट्रिपलआयटी' (सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲण्ड ट्रेनिंग) या प्रकल्पाच्या उभारणीस गती मिळाली आहे. प्रकल्पासाठी ४ हजार चौ.मी. जागा मंजूर केली असून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला आहे. अजितदादांमुळे जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

बीडमध्ये सीट्रिपलआयटी प्रकल्पासाठी ४,००० चौ. मी. जागा मंजूर करण्यात आली आहे. एमआयडीसीकडून जागा देण्यासाठी आणि प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात





आला आहे. हा १९१ कोटींचा प्रकल्प असून, टाटा टेक्नॉलॉजीकडून पुढाकार घेण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी सुमारे ७,००० युवकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. जिल्हा प्रशासन या प्रकल्पासाठी ३३ कोटींचा खर्च उचलणार असून, प्रशिक्षणाचा खर्च पहिल्या तीन वर्षांसाठी टाटा टेक्नॉलॉजीकडून केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे उद्योग आणि रोजगाराच्या संधीमध्ये बीड जिल्ह्यात नवा अध्याय सुरू होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील तरुणांना रोजगार, कौशल्यविकास आणि नवीन तंत्रज्ञान प्रशिक्षणाची संधी मिळणार असून जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळणार आहे, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त करत अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. तसेच, जिल्ह्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रात स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणार असून औद्योगिक वातावरण विकसित होईल, असेही म्हटले आहे.

# आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये- आ.संदीप क्षीरसागर

## पोलीस, आरोग्य, एस.टी., महावितरण विभागाला दिल्या सूचना

बीड ।प्रतिनिधी

आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे. एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे-येणेसाठी दिवसभर विशेष



बसेसची व्यवस्था करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र नारायणगड येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्य पथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. यासोबतच श्री क्षेत्र नारायणगड येथे ४,५,६,७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सेवेचा वसा, माऊलींचा आशीर्वाद - माऊली सेवा मंडळाच्या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद





मुखेड । प्रतिनिधी

सेवा केली संताची, तोचि घडला खरा भक्तीचा पंथ या संत तुकाराम महाराजांच्या ओवीला प्रत्यक्षात उतरवत मुखेड येथील माऊली सेवा मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. ज्ञानेश्वर माऊली पायी दिंडीत सहभागी होणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी मोफत तपासणी आणि औषध वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाला शेकडो वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पायी चालताना होणारा थकवा, अंगदुखी, सर्दी, अपचन, अशक्तपणा यांसारख्या त्रासांवर तातडीने औषधोपचार करण्यात आले. टॉनिक, ओआरएस पावडर, मलम, गोळ्या तसेच वयोवृद्धांसाठी आरोग्य सल्ल्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

या सेवाभावी उपक्रमाच्या यशस्वीतेमागे नांदेड जिल्हा केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष शंतनु शेठ कडगिरे यांची प्रेरणा लाभली. त्यांच्या सोबत औषध व्यावसायिक सदानंद मेडेवार, भागवत कोडगिरे, मंगेश मोतेवार, सुरेश उत्तरवार, नंदू येरगे, रवी शेठ बंडेवार (तामसा), अशोक गंजेवार यांच्यासह असंख्य स्वयंसेवकांनी निस्वार्थ सेवेचे योगदान दिले.

शिबिरात डॉ. अशोक कौरवार, डॉ. भुमे, डॉ. लाडके, डॉ. रचिता कौरवार या वैद्यकीय तज्ज्ञांनी तपासणी आणि सल्ला दिला. औषध वाटपासाठी हजारो स्ट्रीप्सचे मोफत वितरण करण्यात आले.

मुखेड तालुक्यातील केमिस्ट संघटनेचे अध्यक्ष बाळानंद गबाळे, पवन सिंगगटवार, पांडू जोशी, गजानन पाम्पटवर, गजू पत्की, शिवकुमार बिरादार, निखिल काळे, राम पाटील, महेश देशमुख, किशोर रुद्रकंटवर, राजू टोम्पे, अमोल शिंदे, आदित्य नारलावार यांच्यासह अनेक युवक आणि स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी झाले.

जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले या संतांच्या शिकवणीनुसार माऊली सेवा मंडळाने श्रद्धा आणि सेवाभाव यांचा सुरेख संगम साधत हा उपक्रम यशस्वीपणे राबवला. वारकऱ्यांमध्ये या सेवेबद्दल समाधान व्यक्त होत असून, वारकऱ्यांची सेवा हाच खरा माऊलींचा आशीर्वाद या भावनेने प्रेरित उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कै मोरेश्वर भगत सभागृहाला खासदार सुनील तटकरे यांचे नाव देण्याचे नामकरण सोहळा संपन्न होणार आहे!

गडब/सुरेश म्हात्रे

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आदरनीय खासदार सुनिलजी तटकरे साहेब ह्यांच्या वाढदिवसाचे अवचित साधून कै मोरेश्वर भगत शैक्षणिक सामाजिक विकास संस्था खारपाडा ह्या सभागृहाला खासदार मा श्री सुनील तटकरे सभागृह असे नाव देण्यात आले असून सभागृह नामकरण सोहळा महाराष्ट्र राज्याच्या महिला व बाळविकास मंत्री आदरनिय नामदार आदितीताई तटकरे ह्यांचे शुभहस्ते आमदार अनिकेत भाई तटकरे ह्यांच्या उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा कै मोरेश्वर भगत सार्वजनिक वाचनालय अध्यक्ष दयानंद भगत आयोजित बैठीकत दिली आहे कार्यक्रमाची जयत तयारी करणेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस खारपाडा ठाकूरपाडा दुष्मी खैरासावाडी वडमाळवाडी पदाधिकारी कै मोरेश्वर भगत शैक्षणिक संस्था मोरेश्वर भगत सार्वजनिक वाचनालय ह्या सर्व सदस्य पदाधिकारी ह्यांची बैठक आयोजित केली होती या बैठकीत ला वाचनालय उपाध्यक्ष रमेश घरत माजी उपसरपंच हासुराम ठाकूर माजी दिव्यांग प्रहार संघटना अध्यक्ष भालचंद्र भगत माजी उपसरपंच महादेव भगत ग्रामपंचायत सदस्य अनिता भगत पेण विधानसभा महिला चिटणीस ललिता ठाकूर भगत




कुलदैवत अध्यक्ष विलास भगत खारपाडा शाखा अध्यक्ष माजी सरपंच अरुण घरत पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर दुष्मी शाखा अध्यक्ष भाई देसले माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील पाटेकर खारपाडा युवक अध्यक्ष माजी उपसरपंच नितेश घरत वडमालवाडी शाखा अध्यक्ष माजी उपसरपंच मच्छिन्द्र सवार खैरासावाडी शाखा अध्यक्ष संजय कातकरी वाचनालय सदस्य देवराम घरत वाचनालय सदस्य निर्मला ठाकूर खारपाडा महिला अध्यक्ष तथा शैक्षणिक उपाध्यक्ष मालती म्हात्रे ठाकुरपाडा महिला अध्यक्ष तथा वाचनालय सदस्य कुंदा ठाकूर खारपाडा युवती अध्यक्ष तथा शैक्षणिक संस्था सदस्य मेघा पाटील

शैक्षणिक खजिनदार सीता पवार सल्लगार अरुणा ठाकूर वैशाली भगत सल्लागार भगवान घरत आनंद भगत उपस्थित होते साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्याने दहावी बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा भेट वस्तू देऊन सत्कार तसेच आजी माजी सरपंच उपसरपंच ह्यांच्या सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे बैठकिचे संपन्न करणेसाठी पेण तालुका युवक उपाध्यक्ष तथा वाचनालय सचिव कैलास रुठे अमित भगत वाचनालय सदस्य प्रशांत पाटील ग्रंथापाल विजेता म्हात्रे रामा म्हात्रे पारस भगत ह्यांनी मेहनत घेतली.

# आरोग्य खात्यात साहित्य खरेदीमध्ये मोठा गैरव्यवहार

## आ.डॉ.राहुल पाटील यांचा विधानसभेत गंभीर आरोप

परभणी /प्रतिनिधी

राज्यात मागील २ वर्षात आरोग्य खात्यात साहित्य खरेदीमध्ये मोठा गैरव्यवहार होत आहे ६० कोटीची निविदा ६०० कोटी वर कशी जाते याचा शोध घेण्यासाठी श्वेतपत्रिका काढा अशी मागणी आ.डॉ.राहुल पाटील यांनी विधानसभा अधिवेशनात आज केली.

विधानसभेच्या अधिवेशनामध्ये आमदार डॉ.राहुल पाटील यांनी आज राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील गैर व्यवहाराचा मुद्दा उपस्थित केला.मागील दोन वर्षात आरोग्य विभागाने मोठ्या प्रमाणात जनतेच्या निधीची विल्हेवाट लावली आहे.त्यामुळे हजारो कोटी रुपयांचा निधीची चौकशी करण्यासाठी श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली.त्यासोबतच शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्यात साहित्य




खरेदीमध्ये अफरातफर झाली आहे.दोन्ही संस्थामार्फत वेगवेगळी खरेदी करण्यात येत आहे त्यामुळे या सर्व घोटाळ्याची चौकशी करा अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग हे ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्यासाठी स्वंतत्ररित्या साहित्य खरेदी करतात असे देखील आ.पाटील यांनी सभागृहाला निदर्शनास आणून दिले. त्यामुळे दोन्ही विभागासाठी एकत्र खरेदी करावी अशी मागणी त्यांनी केली.महाविद्यालय आणि रुग्णालय यांची साहित्य खरेदी एकत्रच करणार का असा प्रश्न विचारला.तसेच झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी सचिव दर्जाची समिती स्थापन करावी अशी मागणी केली.त्यावर सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी उत्तर दिले,साहित्य खरेदीसाठी लवकरच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन निर्णय होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# देगलूर तालुक्यातील ९० ग्रामपंचायतींसाठी आरक्षण जाहीर; ४६ महिलांना सरपंचपदाची संधी

देगलूर । प्रतिनिधी

देगलूर तालुक्यातील ९० ग्रामपंचायतींसाठी सरपंचपदाचे आरक्षण मंगळवारी (दि. १ जुलै) जाहीर करण्यात आले. पंचायत समितीच्या डॉ. शंकरराव चव्हाण सभागृहात उपजिल्हाधिकारी अनुप पाटील आणि तहसीलदार भरत सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत आरक्षण प्रक्रिया पार पडली. यामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले असून, एकूण ४६ गावे विविध प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत.

आरक्षणानुसार अनुसूचित जाती महिलांसाठी १२ गावे, अनुसूचित जमाती महिलांसाठी ३, ओबीसी महिलांसाठी १२ आणि सर्वसाधारण महिलांसाठी तब्बल १९ गावे आरक्षित झाली आहेत. यामुळे महिलांना गावपातळीवर नेतृत्व करण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.आरक्षणामुळे काही मातब्बर नेत्यांची गावे राखीव झाल्याने त्यांना अपेक्षाभंगाचा सामना करावा लागणार आहे, तर काहींना नेतृत्वाची संधी मिळाल्याने



'सरपंच'पद आरक्षणासाठी सोडत

तालुक्यात 'कहीं खुशी, कहीं गम' अशी स्थिती निर्माण झाली आहे.

आरक्षित गावे पुढीलप्रमाणे -

अनुसूचित जाती (डउ) : मंगाजीवाडी, तुंबरपल्ली, करडखेड, लोणी/पुंजरवाडी, हाणेगाव, करडखेडवाडी, बोरगाव, तुपशेळगाव, चाकूर, कोटेकलूर, सांगवी उमर

अनुसूचित जाती (महिला) : मूजळगा, कारेगाव, देवापूर, लिंगनकेरूर, बळेगाव, भक्तापूर, वझरगा, देगाव, मनसकरगा, वन्नाळी, आचेगाव, बल्लूर

अनुसूचित जमाती (डढ) : येरगी, करेमलकापुर, कावळगड्डा

अनुसूचित जमाती (महिला) : माळेगाव (मक्ता), कावळगाव, वळग

ओबीसी (नागरिकांचे मागास प्रवर्ग) : झरी/पेंडपल्ली, कूतूबशहापूरवाडी, चैनपूर, टाकळी (जहांगीर), नंदूर, मंडगी, मरतोळी, लख्खा, हाळी, बेंबरा, मेदनकल्लूर, शहापूर

ओबीसी (महिला) : आलूर, कूमारपल्ली, कोकलगाव, तडखेल, थडीसावरगाव, नागरळ, बानटाकळी, शेळगाव, मरखेल, आमदापूर, सुंडगी, रमतापूर

सर्वसाधारण : तमलूर, केदारकुंठा, शिवणी, भायेगाव, किनी, क्षिरसमुद्र, मानुर (बु), होट्टल, शेवाळा, कुरूडगी (बु), सोमुर, खानापूर, कुडली, हावरगा, अंबुलगा, खुत्मापूर, बिजलवाडी, भुतन्न हिप्परगा, सांगवी करडखेड

सर्वसाधारण (महिला) : काठेवाडी, शिळवणी, कबीरवाडी, गोगला गोविंद तांडा, ढोसणी, वझर, कामाजीवाडी, दरेगाव, सुगाव, भोकसखेडा, हनुमान हिप्परगा, दावणगिर, येडूर, रामपूर प. होट्टल, गवंडगाव, नरंगल बु, ईब्राहिमपूर, निपाणी सावरगाव, अंतापुर आगामी ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये महिलांचे प्रभावी योगदान अपेक्षित असून, ग्रामीण भागात महिलांचा राजकीय सहभाग वाढण्याची चिन्हे या आरक्षणातून स्पष्टपणे दिसत आहेत.

# वसंतराव नाईकानी देशाला दिशा देण्याचे काम केले : प्राचार्य डॉ. बबन पवार

परभणी : येथील शारदा महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक, कृषी तज्ञ वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. बबन पवार तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे तसेच अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश भालेराव उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीचा गौरवपूर्ण उल्लेख करत वसंतराव नाईकांनी कृषीप्रधान असलेल्या आपल्या देशाला दिशा देण्याचे काम केले असे मत प्रतिपादन



करून वसंतराव नाईक यांनी हरित क्रांती, दुग्ध विकास क्रांती, रोजगार हमी योजना, पंचायत राज व चार कृषी विद्यापीठांची स्थापना करून कृषी क्षेत्राला संजीवनी प्राप्त करून देण्याचे काम केले, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमानंतर जयंतीचे व कृषीदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात प्राचार्य व प्रमुख अतिथींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रा . डॉ.दत्ता चामले प्रा. डॉ. नितीन बावळे, डॉ. सुनील बल्लाळ, डॉ. काझी कलीमोद्दीन, डॉ. शाम पाठक, डॉ. नवनाथ सिंगापूरे, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण कार्यालय प्रमुख सुरेश जयपूरकर यांच्यासह प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अविनाश पांचाळ यांनी प्रास्ताविक डॉ. रमेश भालेराव यांनी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ सचिन खडके यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष येडके, राजाराम मूत्रटकर, कु. तनुजा रासवे, राजकुमार नागुला, शेख जावेद, तुकाराम पवार यांनी प्रयत्न केले.

# आणीबाणी विरोधात संघर्ष करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हा प्रशासनातर्फे सन्मान

## आणीबाणी काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी लढलेल्यांचे योगदान अत्यंत मोलाचे

परभणी : सन १९७५ मध्ये लागू झालेल्या आणीबाणीच्या काळात लोकशाही रक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, तहसीलदार डॉ. संदीप राजापुरे यांच्यासह आणीबाणीच्या विरोधात संघर्ष करणारे लोकशाही सेनानी व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे म्हणाले की, आणीबाणी काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी लढलेल्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्यामुळेच आज आपण स्वातंत्र्य, संविधान आणि मूलभूत अधिकार सुरक्षित ठेवू शकलो आहोत. आणीबाणीमध्ये मूलभूत हक्कांवर बंधने घालण्यात आली होती. लोकशाहीच्या रक्षणासाठी जे नागरिक उभे राहिले, त्यांचा आज आपण गौरव केला आहे. त्यांच्या मागण्यांचे निवेदन शासनाकडे पाठवून योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाहीही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली.

तत्पूर्वी आणीबाणीच्या काळात लोकशाही रक्षणासाठी संघर्ष करणारे जिल्ह्यातील लोकशाही सेनानींना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे



सन्मानपत्र, पुष्पगुच्छ मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. यावेळी आणीबाणी विरोधी चळवळीत सहभागी भास्कर ब्रम्हनाथकर, प्रकाश राजेंद्र आणि रामराव जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी आणीबाणीच्या काळात लोकशाही रक्षणासाठी संघर्ष करणारे जिल्ह्यातील प्रकाश राजेंद्र, सुभाष महाजन, चंद्रकला सोनुने, रामराव जाधव, हरेंद्र कुत्ताबादकर, कृष्णा लंगर, उदय कहाळेकर, नियाज खॉ मोहम्मद खॉ, लक्ष्मण शेरे, भाऊराव वावरे, अशोक वाकडे, अरुण पाठक, दिलीप देशपांडे, भास्कर ब्रम्हनाथकर, लक्ष्मीकांत पांडे, तुकाराम एडके, किशन चमकुरे, गंगाधर जाधव, सुभाष जाधव, धोंडीराज देशपांडे, प्रतिभा मोहरीर, अब्दुल सत्तार खान अब्दुल अजीज खान, सय्यद भाऊद्दिन सय्यद रहमान अली, कांताबाई मगर, संजीवनी बुद्रुककर, दगडुबाई टाळकुटे यांचा सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला.सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे यांनी केले. तर निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# डॉ.गारोळे यांना गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोसर्जन पदवी प्राप्त

गंगाखेड - गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोस्कोपी विषयाचे अभ्यासक्रम व फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेली परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्याबद्दल गंगाखेड शहरातील पोट विकार तज्ञ तथा प्रसिद्ध सर्जन डॉ.किशन गारोळे यांना जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या इंडियन असोसिएशन ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोसर्जन या नामांकित संस्थेच्या वतीने गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोसर्जन पदवी प्रदान करण्यात आली आहे. संस्थेतर्फे गेल्या ३१ वर्षामध्ये एकूण १२००० सर्जन डॉक्टरांना पदवी बहाल करण्यात आली असून यामध्ये डॉ.गारोळे यांनाही पदवी बहाल करण्यात आली आहे

या अगोदरही डॉक्टर गारोळे यांनी २०१४ साली इंडियन असोसिएशन ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोसर्जन्स फेलोशिप आणि २०१६ साली फेलोशिप इन मिनिमल क्सेस सर्जरी या पदव्या प्राप्त केल्या आहेत गंगाखेड शहरासाठी ही अभिमानाची बाब असून गेली ३१ वर्षे जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या इंडियन असोसिएशन ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोसर्जन या नामांकित संस्थेच्या वतीने गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोसर्जन पदवी बहाल करण्यात आली आहे या यशाबद्दल गंगाखेड शहरातील डॉक्टर असोसिएशनच्या वतीने डॉ.गारोळे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या यासोबत शहरातील व परिसरातील सामाजिक राजकीय धार्मिक, मित्र परिवार आदीसह सर्व स्तरामधून डॉ.गारोळे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे

# अनिकेत अन्नमवाड या तरूण कर्मचार्याचा कार्यालयात हृदयविकाराने मृत्यु

मुखेड प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील अंबुलगा बु. येथिल अनिकेत गंगाराम अन्नमवाड हे दुय्यम निबंधक कार्यालय पांढरकवडा जि.यवतमाळ या



कार्यलयात कर्तव्यावर असताना हृदयविकारांच्या तीव्र झटक्याने वयाच्या पस्तीसाव्या वर्षी निधन झाले. अतिशय कमी वयात मृत्यु झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या पश्च्यात दोन लहान मुलं असून पत्नी,आई,भाऊ असा परिवार आहे.मुखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.रामोड साहेब यांचे ते जावाई होते.

अंत्याविधी दिनांक ४ रोजी मुळगावी मुखेड तालुक्यातील अंबुलगा बु. येथे दुपारी १ वाजता होणार आहे.

# कर्ज मागायला लाज कशी वाटत नाही? - कृषी दिनीच शेतकऱ्याचा अपमान!

डॉ आशिष तिवारी/मंठा -

कृषी दिनाच्या दिवशीच शेतकऱ्याचा बँकेत अपमान झाल्याची धक्कादायक घटना तळणी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत घडली. कर्ज मागायला लाज कशी वाटत नाही? असे अपमानजनक शब्द वापरत शाखाधिकारी बी. जे. केडिया यांनी प्रगतशील शेतकरी वसंत नायब राव सरोदे (रा. उस्वद) यांच्याशी सार्वजनिकरीत्या अपमानास्पद वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.ही घटना १ जुलै रोजी घडली. काही दिवसांपूर्वीच वसंत सरोदे यांनी आपली थकबाकी - ८२,६११ - पूर्णपणे फेडली होती. त्यानंतर त्यांनी हंगामी कर्जासाठी अर्ज केला असता, बँक अधिकाऱ्यांनी त्यांना झिडकारले. यामुळे संपूर्ण शेतकरी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे थेट तक्रार

सरोदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करत १० जुलैपर्यंत कारवाई न झाल्यास आत्मदहनाचा इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले की, कर्ज फेडूनही जर असं अपमानित व्हायचं असेल, तर जगून काय उपयोग?




## तळणी शाखेतील बँक अधिकाऱ्याच्या वागणुकीचा संताप; कारवाईची जोरदार मागणी

शाखाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

शाखाधिकारी बी. जे. केडिया यांनी मात्र सर्व आरोप फेटाळले असून, मी कुणालाही अपमानित केले नाही. गैरसमज झाला असल्यास मी माफी मागतो, असे सांगितले.

आधीही तक्रारी

यापूर्वीही शाखाधिकारी केडिया यांच्यावर खाते होल्ड करणे, कर्ज नाकारणे, व ग्राहकांना अपमानित करणे यासंदर्भातील तक्रारी झाल्याचे उघड झाले आहे.

शिवसेनेचा जाबविचार मोर्चा

२ जुलै रोजी, शिवसेना (उबाठा गट) तालुका संघटक ज्ञानेश्वर (माऊली) सरकटे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसह बँकेत जाऊन संबंधित अधिकाऱ्याला जाब विचारण्यात आला.

# पाटोद्यात माणुसकीचे दर्शन गाई संकटात, तलाठ्यांनी दाखवली माणुसकी, डॉक्टरांनी वाचवले प्राण



पाटोदा (प्रतिनिधी)

गुरूवारी सकाळच्या शांततेत एक आवाज दाटून आला मदतीची हाकेचा. तहसील कार्यालयाच्या आवारात पडलेल्या गाईंच्या करुण अवस्थेनं आज काही मनं हलवून टाकली... आणि मग घडली एक अशी घटना, जी केवळ एक बातमी नव्हे, तर सामाजिक भान आणि तत्परतेचा आदर्श ठरली.सकाळी सहाच्या सुमारास व्यायाम करण्यासाठी बाहेर पडलेले पाटोदा तालुक्यातील तलाठी बाबर साहेब, तलाठी शिवणकर साहेब,पोस्ट कर्मचारी बुधवंत साहेब, व्यापारी सुजित कोल्हे आणि आबा वराडे या मित्र मंडळींनी पाटोदा तहसील कार्यालय आवारात गावरान खिलारी गाई गटांगळ्या खात, जमिनीवर अंथरुणाला खिळलेल्या अवस्थेत पाहिली. क्षणभर थबकले... पण पुढे गेले नाहीत – ते मित्र थांबले, विचार केला आणि कृती केली. ते म्हणाले, आपण प्रशासनाचा भाग आहोत, पण त्याही आधी माणूस आहोत.त्यांनी तात्काळ पाटोद्यातील पशुवैद्यकीय डॉक्टरांना संपर्क साधला. प्रतिसादही तितकाच झपाट्याचा – डॉ. अण्णा गोरे, डॉ. नरेंद्र जावळे आणि डॉ. हरिदास शेलार व ओम गोरे हे अनुभवी डॉक्टर काहीच वेळात घटनास्थळी दाखल झाले.गाईंची स्थिती तपासून त्यांनी औषधोपचार, सलाईन आणि आवश्यक मदतीची तत्काळ सोय केली. काही वेळातच गाईंची प्रकृती स्थिर झाली आणि त्यांना पुढील निगराणीखाली हलवण्यात आले.ही फक्त एक मदत नव्हती, ती होती एक भूमिका – जाणीवेची आणि जबाबदारीची. या घटनेतून काही गोष्टी ठळकपणे पुढे येतातः सामाजिक जाणीव: संकटात असलेल्या निराधार जीवांची वेदना ओळखून मदतीचा हात पुढे करणं हीच खरी सामाजिक बांधिलकी.तत्परता: वेळेवर निर्णय घेणं आणि कृतीत उतरवणं – तलाठी व डॉक्टर मंडळींनी हे उत्तम दाखवून दिलं.सामूहिक जबाबदारी: प्रशासन, नागरिक आणि सेवाभावी वृत्ती यांचं योग्य मिश्रण हेच समाजाचं खऱ्या अर्थानं बळ आहे.आज पाटोद्यात गाई वाचली... पण त्याच वेळी एक गोष्ट पुन्हा अधोरेखित झाली माणुसकी अजूनही श्वास घेत आहे... आणि ती इथे, आपल्या पाटोदा गावात जिवंत आहे.

# हंबर्डे कॉलेजसाठी सौ.सरस्वती जाधव आणि प्रा.विष्णू चौधरी यांची सेवा गौरवा पलीकडची आहे – किशोर नाना हंबर्डे



आष्टी – (प्रतिनिधी) हंबर्डे महाविद्यालयात कार्यालयीन अधीक्षिका सौ. सरस्वती जाधव यांची चाळीस वर्षे सेवा झाली. गणित विषयाचे प्रा. विष्णू चौधरी यांची तीस वर्षे सेवा झाली. दोघांनीही निष्ठेने आपली सेवा केली. या महाविद्यालयाचा प्राध्यापक, कर्मचारी वृंद सचोटीने परिश्रम करीत आला आहे. त्यांनी महाविद्यालयाला आपलं मानलं. त्यांचा विद्यार्थी उच्च पदावर सर्व दूर पसरलेला असून तो आजही कर्मचारी, शिक्षकांबद्दल आदर ठेवून आहे. आपणही विद्यार्थी घडवले आहेत, त्यांच्यावर चांगले संस्कार केले आहेत, याचा आनंद प्रत्येकांच्या चेहऱ्यावर दिसतो आहे. प्रत्येक जण विश्वासाला पात्र ठरला. संस्थाचालक या नात्याने आम्हाला वाटणारा आनंद यापेक्षा वेगळा नाही. कार्यालयीन अधीक्षिका श्रीमती सरस्वती गोविंदराव जाधव आणि प्रा. विष्णू संभाजी चौधरी यांची सेवा म्हणूनच गौरवा पलीकडची आहे. असे संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे म्हणाले. दोन्हींच्या सेवा गौरव समारंभात त्यांनी हे प्रशंसनीय उद्गार काढले.

दोन्ही कार्यक्रमाला सचिव अतुलकुमार मेहेर, उपाध्यक्ष दिलीप शेठ वर्धमाने, मातोश्री रत्नमाला हंबर्डे, सौ. सुलभा हंबर्डे, सौ. ज्योती मेहेर, सौ. अनिता निंबोरे, ज्येष्ठ पत्रकार, माजी उपप्राचार्य अनंत हंबर्डे, माजी प्राचार्य व्हि. एल. शिंदे, डॉ. प्रताप गायकवाड, सुभान शेठ पठाण, प्रा. महेश चवरे, प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, प्राचार्या सायली हंबर्डे, प्राचार्य बापूराव धोंडे, सचिन आण्णा लोखंडे, आदर्श शिक्षक पी. वाय. काळे, राजेंद्र लाड, सुभाष रासकर, भोसले महाराज, पुरी महाराज, शशिकांत खाडे, शेषराव सानप, मा. सरपंच सौ. अदिकाताई लोखंडे, यांच्यासह अनेक आजी – माजी प्राध्यापक, कर्मचारी यांनी उपस्थिती लावली. श्रीमती लीला शिरोळे, प्रा. अविनाश कंदले, डॉ. अभय शिंदे, प्रियंका माने, पोर्णिमा माने, प्रा. शहाजी माने त्याचबरोबर तानाजी रेडेकर, प्रा. सचिन कल्याणकर, प्रा. डॉ. दत्तात्रय मुंढे, लक्ष्मण रेडेकर, सोमनाथ वाळके, मधुकर गरगटे, प्रा. बिरुबा शिंदे, प्रा. सुचित्रा जाधव, डॉ. विनय चौधरी यांनी मनोगते व्यक्त केली. संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे आणि सर्व मान्यवरांच्या हस्ते जाधव आणि चौधरी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. राजाराम सोनटक्के यांनी आभार मानले. परिवेक्षक प्रा. अशोक भोगाडे, डॉ. सखाराम वांढरे, प्रा. रवी सातभाई यांनी परिश्रम घेतले.

# अंबाजोगाईच्या ऊसतोड मजुराच्या मुलाचा आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियन शिपमध्ये यशस्वी डंका

## राजकिशोर मोदी यांच्या वतीने आदित्यच्या यशाचा सन्मान

अंबाजोगाई (प्रतिनिधी) – अंबाजोगाई शहरातील मंगळवार पेठ भागातील रहिवाशी असलेल्या ऊसतोड कामगाराचा मुलगा चि. आदित्य दिलीप जाधव (वय १७) या तरुणाने एशियन चॅम्पियन शिप मध्ये रौप्यपदक पटकावत आपल्या उल्लेखनीय कामगिरीने अंबाजोगाई शहरासह संपूर्ण भारत देशाची मान उंचावली आहे. व्हिएतनाम येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात रौप्यपदक (सिल्वर मेडल) पटकावून आदित्यने जागतिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत अपार मेहनत, कठोर सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आदित्य जाधवने हे दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्याची ही झेप केवळ वैयक्तिक नाही, तर लाखो गरीब घरातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.चि आदित्यची प्रेरणा इतर तरुण घेऊन अपार मेहनत तथा कष्टाने त्यांच्यासारखेच यश संपादन करून समाजाचे त्याचबरोबर आपल्या देशाचे नाव उज्वल करतील अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आदित्यचा सत्कार व सन्मान करतांना व्यक्त केली. आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थिती ला दोष न देता त्याने केलेल्या कष्टाचे हे फलित असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे नुकताच आदित्य जाधवचा शाल व फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना राजकिशोर मोदी म्हणाले की अशा मेहनती, जिद्दी आणि संघर्षातून वर आलेल्या मुलांना वेळेवर योग्य दिशा आणि पाठबळ दिलं, तर तेभविष्यात देशाचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच उज्वल करतात. आदित्य सारख्या मुलांमधूनच नव्या भारताची उमेद आहे. त्याचे यश हे केवळ अंबाजोगाई शहरासाठीच नव्हे तर संपूर्ण भारत देशासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे मोदी यांनी या सत्कार प्रसंगी नमूद केले. त्याच्याकडून भविष्यात देखील ऑलिम्पिक मध्येही पदक मिळवण्याची अपेक्षा आपण नक्की बाळगू शकतो असा विश्वास देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. यावेळी आदित्यच्या पालक, प्रशिक्षक व त्याच्या



संपूर्ण टीमचे अभिनंदन व कौतुक राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना आदित्यने काटेकोर प्रशिक्षण, आहार, नियमित व्यायामासोबतच योग्य प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती यांच्या जोरावरच आपन हा यशस्वी प्रवास केला असल्याचे सांगितले.क्रीडा क्षेत्रात अडथळे असले तरी हार न मानता चिकाटीने पुढे जाण्याची जिद्द ठेवण्याचे आवाहन यावेळी आदित्य जाधव याने केले आहे . त्याच्या या यशस्वी व दैदिप्यमान कामगिरीमुळे अंबाजोगाईच्या तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

या सत्कार प्रसंगी आदित्यच्या नातेवाईकासह माजी नगरसेवक दिनेश भराडिया, दत्ता सरवदे, रफिक गवळी, विजय रापतवार, वजीर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राजकिशोर मोदी यांनी आदित्यच्या यशाचं कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. सय्यद डेंटल क्लिनिकचा आदर्श उपक्रम



वारकऱ्यांना टूथब्रश, टूथपेस्टचे मोफत वाटप

आष्टी – (प्रतिनिधी) आष्टी जिल्हा बीड येथील डॉ. सय्यद डेंटल क्लिनिकच्या वतीने पंढरपूर कडे आगेकुछ करणाऱ्या धुळे जिल्ह्यातील सिंदखेडच्या मठाधिपती मेघशाम नारायण महाराज यांच्या दिंडीतील दीडशे वारकऱ्यांना बुधवार दिनांक २ जुलै २०२५ रोजी जामगाव रोडवरील सुनील लक्ष्मण रेडेकर यांच्या वस्तीवर, टुथब्रश, टुथपेस्टचे मोफत वाटप करण्यात आले.

रेडेकर वस्तीवर थांबून पुढे मार्गस्थ होणारी ही एकेचाळीसावी दिंडी होती. डॉ. सय्यद डेंटल क्लिनिकचे डॉ. सय्यद हुमायुद्दीन आणि कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांच्या विनंतीला मान देऊन लक्ष्मण बापू रेडेकर, सुनील रेडेकर, जालिंदर मच्छिंद्र पोकळे, दादासाहेब उर्फ पप्पू गर्जे, प्रा. अशोक भोगाडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ. सय्यद वलीयुद्दीन अल्लाउद्दीन यांनी सर्वांचे आभार मानले.



# लोकनेते बाबुरावजी आडसकर महा विद्यालयात पांडुरंग आगळे व जितेंद्र देशमुख यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

केज/प्रतिनिधी

लोकनेते बाबुरावजी आडसकर महा विद्यालयात पांडुरंग आगळे व जितेंद्र देशमुख यांच्या नियत वयोमानानुसार सेवा निवृत्ती झाली असल्या मुळे त्यांना महा विद्यालयाच्या वतीने सेवापूर्ती सोहळ्यात या दोघांनाही सपत्नीक सन्मानित करण्यात आले.पांडुरंग आगळे हे महाविद्यालयात १९९३ पासुन वरिष्ठ लिपिक म्हणून तर जितेंद्र देशमुख १९९७ पासुन प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून सेवेत कार्यरत होते.पांडुरंग आगळे हे महत्वाच्या परिक्षा विभागाचे काम पाहत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अडचणीत त्यांचे महत्वाचे योगदान होते असे प्राचार्य डॉ. माधवराव फावडे सर यांनी सांगितले. प्रयोगशाळा सहाय्यक जितेंद्र देशमुख यांच्या ही कामाबद्दल गौरव केला.या सेवापुर्ती सोहळ्यात सौ.आगळे ताई व सौ.देशमुख ताई यांचा ही सत्कार अनुक्रमे डॉ.आशा बोबडे व डॉ.रतन गंगणे यांनी केला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिक्षक पी.एस. भोसले यांनी केले.या कार्यक्रमात डॉ.छत्रभुज इंगळे,डॉ.चत्रभुज सोळंके,डॉ.शाम जाधव, डॉ.नवनाथ काशिद, डॉ.सुनिल राऊत,डॉ. सुधीर आगळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.सत्कारमूर्ती आगळे व देशमुख यांनी ही आपल्या भावना व्यक्त केल्या.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.बाबासाहेब हिरवे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.प्रशांत क्षीरसागर

# शुक्रवारी जैन मुनींच्या उपस्थितीत भव्य शोभायात्रा

अंबाजोगाई –: सकल जैन समाजाचे मुनी श्री. जयशेखर महाराज,व मुनी जयघोष महाराज यांच्या आगमना प्रित्यर्थ व चातुर्मास प्रारंभा निमित्त शुक्रवारी सकाळी ११ वाजता सकल जैन समाज, राजस्थानी समाज व शहरवासीयांची भव्य शोभायात्रा शहरातून निघणार आहे.

जैन समाजात चातुर्मास सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो. या वर्षी १० जुलै ते ६ नोव्हेंबर या कालावधीत मध्ये येथील जैन स्थानक येथे हा चातुर्मास

जैन समाजाचे मुनी श्री. जयशेखर महाराज,व मुनी जयघोष महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या दोन्ही मुनींच्या आगमना प्रीत्यर्थ शुक्रवारी सकाळी ११ वाजता भव्य शोभायात्रा शहरातून निघणार आहे.ही शोभायात्रा योगेश्वरी नगरी वाघाळारोड येथून निघणार आहे. छत्रपती चौक,राजीव गांधी चौक, मोंढा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुरुवार पेठ मार्गे ही शोभायात्रा जैन स्थानकात पोहोचणार आहे.या शोभायात्रेत भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अंबाजोगाई जैन

श्रावक संघाचे अध्यक्ष धनराज सोळंकी, उपाध्यक्ष ऋषभ मुथा,सौरभ कर्णावट, आनंद बडेरा, प्रतीक बोथरा,यश बडेरा, सविता मुथा,सोनाली कर्णावट, सुरेखा मुथा यांनी केले आहे.

# एसबीआय बँकेचा ७०, वा वर्धापन दिन वडवणीत साजरा मयत खातेदाराच्या वारसाला दिला दोन लाखाचा धनादेश

## शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वी

वडवणी /प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँक संपूर्ण भारत देशामध्ये नावाजलेली बँक आहे. या बँकेचे कोट्यावधी ग्राहक असून बँक विश्वासार्हतेच्या बळावर आजही नावलौकिक करत आहे. या बँकेचा सत्तरावा वर्धापन दिन वडवणी येथील एसबीआयच्या शाखेमध्ये साजरा करण्यात आला. बँकेच्या वतीने गेल्या आठवड्यात भव्य दिव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले होते. तर एक जुलै या कर्षिदिनी बँकेचे ग्राहकाच्या हस्ते केक कापून बँकेचा ७० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. बँकेचे शाकाधिकारी अंकुशराव जाधव आणि इतर सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी उपस्थित सर्व ग्राहक शेतकरी बांधवांना यावेळी शुभेच्छा दिल्या तर बँकेचा एका खातेदार ग्राहकाचा मृत्यू झाला होता त्या ग्राहकाचा विमा उतरला असल्यामुळे दोन लाखाचा धनादेश यावेळी त्यांच्या कुटुबीयांना देण्यात आला.

वडवणी येथील भारतीय स्टेट बँकेत शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांच्या नियोजनाखाली बँकेचा कारभार अगदी योग्य पद्धतीने चालत आहे. या बँकेच्या मार्फत शेतकरी व्यापारी तसेच नोकरदारांना योग्य सेवा दिली जाते. त्यामुळे या बँकेचे नावलौकिक मोठ्या प्रमाणात झालेले आहे. या बँकेमध्ये ७० वा वर्धापन दिनानिमित्त गेल्या आठवड्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७० जणांनी रक्तदान केले



सर्व रक्तदात्यांना बँकेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली तर या बँकेचे ग्राहक असलेले लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांच्या वतीने एक झाड आणि पुस्तक देऊन रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर एक जुलै हा बँकेचा वर्धापन दिन असल्यामुळे आणि याच दिवशी कृषी दिन असल्यामुळे बँकेमध्ये भव्य दिव्य वर्धापन दिन साजरा करण्यात आला. बँकेचे वयस्कर ग्राहक श्री भंडारे यांच्या हस्ते केक कापून बँकेचा सत्तरावा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी बँकेचे शेकडो ग्राहक उपस्थित होते. आलेल्या सर्व ग्राहकांना बँकेचे शाकाधिकारी अंकुशराव जाधव तसेच सहाय्यक शाखाधिकारी गजानन बोकारे, रवींद्र बाळासाहेब गांगर्डे , भ्रिगू पाठक, संकेत शहाणे, राज टकले, अरुण शिंदे ज्ञानेश्वर शिंदे , यांनी स्वागत केले. यावेळी बोलताना शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांनी सांगितले की भारतीय स्टेट बँक ही ग्राहकांच्या सेवेमध्ये नेहमी तत्पर असते. सर्वसामान्य शेतकरी तसेच व्यापारी नोकरदार आणि शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व ग्राहकांना बँक योग्य पद्धतीने सेवा देत आहे. पुढील काळातही बँक ग्राहकांच्या हिताचे कामकाज करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी बँकेचे मयत ग्राहक सोनाजी पाराजी उजगरे यांचा मृत्यू झाल्यामुळे तसेच त्यांचा २० रुपयाचा विमा उतरलेला असल्यामुळे त्यांना बँकेच्या माध्यमातून त्यांच्या वारसाला दोन लाखाचा धनादेश विभागीय अधिकारी अमित धुळे व बँकेचे मुख्य प्रबंधक एबेनेझर राज यांच्या हस्ते

# बीड येथे आजपासून चार दिवस रंगणार आषाढी महोत्सव संगीतमय कथा व सांप्रदायिक कीर्तने

बीड/प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त संपूर्णमहाराष्ट्रात आणि देशभरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते. पंढरपूरची वारी गाठता न आलेल्या भाविकां साठी बीडमध्येही अध्यात्मिक वातावरणाची अनुभूती यावी,या हेतूने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने नवनाथ कथा व सांप्रदायिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन दिनांक ४ जुलै ते ७ जुलै २०२५ दरम्यान करण्यात आले आहे.या चार दिवसीय भक्तिमय सोहळ्याचे आयोजन बीड येथील खटोड प्लाझा,वृंदावन गार्डनजवळ, एमआयडीसी रोड येथे पार पडणार आहे.या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कथाकार व कीर्तनकार सहभागी




होणार असून, विशेष आकर्षण ठरणार आहे साध्वी सोनाली दिदी करपे (चकलांबा) यांचे नवनाथ कथेचे संगीतमय,रसाळ आणि सखोल निरूपण.तसेच इतर अनुभवी कीर्तनकार आपल्या कीर्तनसेवेने भाविकांना मंत्रमुग्ध करतील.

विशेष आकर्षण दि.०६ जुलै २०२५ (आषाढी एकादशी) डॉ.रमेश घोडके व डॉ.उर्मिला घोडके यांच्या वतीने सर्व भाविकांसाठी फराळ प्रसादाचे मोफत वाटप करण्यात येणार आहे फराळाची वेळ सकाळी १२ ते दुपारी ३असणार आहे.गेल्या २० वर्षांपासून संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य खटोड प्रतिष्ठान सातत्याने करीत आले आहे.समाजात अध्यात्मिक मूल्ये रुजावीत,संतांच्या विचारांचे चिंतन व्हावे, याकरिता हे आयोजन विशेष महत्त्वाचे ठरत आहे.तरी सर्व भाविक भक्तांनी आपल्या परिवारासह या भक्तिपूर्ण महोत्सवात उपस्थित राहून संगीतमय कथा,कीर्तन व फराळ प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.



**केज/प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारी साने गुरुजी निवासी विद्यालय जिल्ह्यातील एकमेव शाळा असुन बीड जिल्ह्यात साने गुरुजी निवासीविद्यालय केजने शैक्षणिक क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे असे गौरवोद्गार गट शिक्षण अधिकारी श्री.लक्ष्मण राव बेडस्कर यांनी काढले.ते नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्व संध्येला विद्यार्थ्यांना वह्या,पुस्तके,शालेय दप्तरचे वाटपकरण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**